# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १६/१०/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक १६/१०/२००३ रोजी सभा सुचना क्र. १९ दि. १०/१०/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. पाटील मोहन मधुकर | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य, |
| ८) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ९) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| १०) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| ११) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १२) | श्री. हॅरल बोर्जीस | सदस्य |
| १३) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| १४) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| २) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरुवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

मा. सभापती साहेबांनी गेल्या सभेत दोन रूलिंग दिले होते जोजफ घोन्सालवीस ह्यांच्या बोर्डबाबत निविदा काढण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे. तसेच शिक्षण विभागाचे घोडबंदर येथील शाळेत संगणक कमर्चारी नेमणेबाबत प्रस्ताव तयार केला आहे आणि पुढील सभेत प्रस्ताव ठेवण्याचा आदेश देण्यात आलेला आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभा सुरू होण्यापूर्वी आम्हाला जे मा. महासभेसाठी जी पुरवणी दिली आहे. त्याच्यातले विषय कुठले आहेत ते आपण आम्हाला स्थायी समितीमध्ये समजावून सांगा.

**प्र. सचिव :-**

पहिले आपले तीन विषय होते. त्याच्यातले प्रकरण -२ च्या (ज) प्रमाणे दोन पूरक प्रश्न आलेले आहेत ती पूर्व घोषणा प्रसिद्ध केलेली आहे. व अजेन्डा सरक्यूलेट केलेला आहे. कायद्याने ते सभेत विचार विनिमय करण्यासाठी घ्यायचे असतात. त्याप्रमाणे मी अजेन्डा आपल्याला दिलेला आहे.

**मा. सभापती :-**

मा. महासभेच्या विषयावर आता येथे चर्चा होउ शकत नाही. स्थायी समितीमध्ये जे विषय आहेत त्याविषयावर आपण चर्चा करावी.

**धनराज अग्रवाल :-**

जे गाळे बांधतात ते काम अजून ही चालू आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मी जे उत्तर मा. महासभेत दिले आहे ते आपण तपासून पाहिले तर वेस्ट आणि बी.पी.रोड हयाचे रोड वायडींग करत असताना पाठीमागे जे पंचवीस फुटाचे इनक्रोजमेंट झालेले होते ते काढल्यानंतर जी दुकाने चालू राहिली. मात्र आपण त्यांचे पूर्ण बांधकाम काढलेले आहे आणि शिल्लक असलेले त्यांच्या जागेमध्ये त्यांना बांधायला कमीशनर साहेबांनी परवानगी दिलेली आहे. असे मा. महासभेत त्यांनी सांगितलेले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

स्थगिती आहे म्हणजे काय?

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

स्थगिती म्हणजे जी मायनर मोडीफिकेशन चालू आहे. बारा फुटाचे त्याच्यामध्ये ठराव काय होईल हे पाहण्यासाठी स्थगिती दिली होती. मा. महासभेचा ठराव अजून पर्यंत आमच्याकडे आलेला नाही आणि काय ठराव झाला आहे ते पाहून निर्णय घेण्यात येईल.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य धनराजजी, अग्रवालजी व सर्व स्थायी समिती सदस्य, मा. सभापती आपण एक निणर्य घेतलेला आहे की महत्वाचे विषय काहीही असला तरी स्थायी समितीमध्ये चर्चा करण्यासाठी आपण सभेनंतर चर्चा करावी. आणि हयाच्यापुढे हा पायंडा पडला पाहिजे. आपणच हे विषय ठरवायचे आणि पुन्हा आपणच त्याला बगल द्यायचे. कारण स्थायीसमितीमध्ये आपण शहराच्या विकासाशी आरोग्याशी आणि संरक्षणाशी निगडीत अशा सर्व विषयांवर आपण निणर्य घेत असतो. हे निर्णय घेताना आपण त्या विषयावर आधी चर्चा करून नंतर त्याला पूरक असलेले विषय सभा संपल्यानंतर घ्यायचे असा आपण पायंडा ठेवला आहे. तोच आपण पुढे वाढूया.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४७ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

पान क्र. ३२ वर सभापती साहेबांनी म्हटले आहे सन्मा. सदस्यांना ह्याची माहिती पुढच्या सभेत देउ. पण ती माहिती सभागृहापुढे आलेली नाही.

**प्र. सचिव :-**

टेंडर काढण्याचे आदेश दिले आहेत.

**रिटा शाह :-**

टेंडर काढण्याचे मा. महासभेत झाले होते. टेंडर काढून आले होते. त्यावेळी मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर अजूनही मिळालेले नाही. आरक्षणाचे बोर्ड जेव्हा तयार झाले होते ते उचलून रात्रीच्या रात्री कोणी एका प्लॉटमध्ये लावले त्याचे नाव अजूनपर्यंत का देत नाही? आणि आपली वस्तू चोरीला जाते त्याच्याबद्दल प्रशासन काय करते? आपला बोर्ड उचलून कोण रात्रीच्या रात्री लावतो त्याचा अर्थ काय आहे. आपली जी आरक्षीत जागा आहे तिथे बोर्ड लावायला पाहिजे त्याला माझा विरोध नाही आहे. मा. महासभेत विषय यायच्या अगोदर बोर्ड तयार झाले. त्यावेळी नाईक साहेब आयुक्त होते आणि मी त्यांा विचारले ही होते त्यावेळी आपण नाव दिले नाही. आणि आपला बोर्ड चोरीला गेला होता. रात्रीच्या रात्री जाउन त्यांनी बोर्ड चोरून लावले त्याबद्दल प्रशासनाने त्याच्यावर काय कार्यवाही केली? ती कोण व्यक्ती आहे जी बोर्ड चोरून नेते आणि लावते. एवढी डेरींग त्या व्यक्तीमध्ये आहे. आपण मोठमोठया गोष्टी करतो शहराच्या विकासाच्या गोष्टी करतो आणि आपल्याकडे एवढे मोठे गुन्हे

होतात कोण चोरून पाईप लाईन घालून देतो. कोण चोरून कनेक्शन घेतो, इतिवृत्तांतात ह्या सर्व गोष्टींची नोंद होते पण त्याच्यावर कार्य वाही काय? जर कोर्ट बघेज तर प्रशासन काय करते.

**दिपक खांबीत :-**

गोखले साहेब ते बोर्ड कोणी लावले होते.

**संजय गोखले :-**

मला माहित नाही.

**रिटा शाह :-**

साहेब आसिफ शेख सारखे बोलतात की तुम्ही एखाद्याला घरी बसवा कारण ज्याच्यावर बोर्ड सांभाळण्याची जिम्मेदारी होती त्याच्यावर तुम्ही ॲक्शन घ्या. मग आपोआप नाव निघेल. मी कोणत्याही अधिकारी बद्दल बोलत नाही. ते बोर्ड ज्याच्या ताब्यात असेल त्याची जिम्मेदारी आहे. ते बोर्ड तेथून कसे चोरीला जातात आणि ते कोणी लावले.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साहेब) :-**

हा विषय एक वर्षापूर्वीचा आहे.

**रिटा शाह :-**

एका वर्षापुर्वीचा सांगून तुम्हाला जर गोलमोल करायचा असेल तर मला मान्य आहे. तुम्हा करा.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

गोलमोल करत नाही. तुमच्या प्रश्नाला उत्तर देतो. हा विषय एका वर्षापुर्वीचा आहे. कोणीतरी तिथे येउन बोर्ड लावले त्यांनी नगरपालिकेचा बोर्ड लावला का? स्वतः हून आणून बोर्ड लावला. पण ते बोर्ड काढून टाकले हे नक्की आहे.

**रिटा शाह :-**

आपल्या सभेत विषय येत नाही. तो पारित होत नाही. त्याच्या अगोदर आपल्याकडे असे प्रकरण घडतात.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

बोर्ड लावले होते. पण ते बोर्ड काढून टाकण्यात आले हाते. व नंतर मी. महासभेची मंजूरी घेउन जे ॲक्शन घेउन ही जागा ह्या कारणासाठी आरक्षीत आहे एवढेच बोर्ड लावायचे आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, त्यावेळी मी आपल्याला नाव विचारले होते पण तुम्ही सांगितले नाव देणार नाही असे मा. महासभेत आलेले आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

कोणी बोर्ड लावले होते ते आम्हाला नंतर समजले होते. परंतू ते नाव चर्चे ला कशाला द्यायचे. त्यांनी स्वतःचे बोर्ड लावले का नगरपालिकेचा बोर्ड लावला.

**रिटा शाह :-**

त्यांनी स्वतःचा बोर्ड लावला हा गुन्हा आहे का नाही. आणि स्वतःचे बोर्ड नाही, आपल्या महानगरपालिकेचा बोर्ड गेलेला आहे. आणि तुम्ही जर असे काही बोलुन झाकत असाल तर मला मान्य आहे. तुम्ही ते झाकून घ्या. महानगरपालिकेने बनविले नाही असे तुम्हाला ढाकमिसोडा करायचा तर करा आणि तुमच्या अधिकाऱ्याला वाचवा. आणि तुम्ही हे वाचवायचे काम करता म्हणून गुन्हे वाढले आहे हे तुम्ही समजून घ्या. कारण आपल्याकडे एवढे एफ.आय.आर. दाखल झाले आहे त्याची कार्यवाही कुठे ही झालेली दिसत नाही.

**शिवमुर्ती नाईक :-**

सविस्तर चौकशी करुन तुम्हाला माहिती देतो.

**रिटा शाहः-**

एक वर्ष झाले तुम्ही केव्हा चौकशी करणार? पंचवार्षिक योजना लावली आहे काशिवमुर्ती

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

मॅडम मी आता उपआयुक्त आहे. माझ्या अधिकार कक्षात जात नाही. म्हणून मी चौकशी केली नाही व आता चौकशी करुन सविस्तर तुम्हाला माहिती विचारुन देतो.

**रिटा शाहः-**

मी विचारतानाच सांगितले होते साहेब तेव्हा आयुक्त होते. आता नाही आहे. व आता तुमची जबाबदारी नाही उत्तर द्यायची. एक वर्ष झाले ठिक आहे. आपण झाकून ठेवले. आणखीन पाच वर्ष झाकून ठेवा. पण ह्या महानगरपालिकेमध्ये अशाप्रकारचे गुन्हे वाढणार असा मी आरोप लावत नाही तर ठामपणे मी सांगते अशी डेरींग तुमच्या अधिका-यांची वाढणार.

**जोजफ घोन्सालवीस :-**

बोर्ड लावायचा मा. महासभेत ठराव घेतला तर त्याची अंमलबजावणी किती दिवसात करतात.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

यामध्ये चर्चेला असा विषय आला होता. नगरपालिकेने भू संपादन केल्यानंतर बोर्ड लावायचे का? ही जागा आरक्षित आहे असा मुद्दा आला होता. पहिल्या सुरूवातील सर्व आरक्षणावर बोर्ड लावण्याचा निर्णय महासभेत त्यावेळेच्या कौन्सिलरने घेतला व कौन्सिलरने निणर्य घेतल्यानंतर त्यावेळेला बोर्डाचा जो खर्च आहे त्याच्या बजेटचे प्रोव्हीजन केलेले नव्हते. नंतर बजेट प्रोव्हीजन केले व वाद असा उपस्थित झाला की भू संपादन करण्याच्या अगोदर तुम्हाला बोर्ड लावता येते का? मग आम्ही त्यावेळेला सांगितले की त्यासाठी टेंडर काढलेले नव्हते. आम्ही त्यावेळेला सांगितले ही जागा त्या कारणासाठी आरक्षित आहे. मालक तेच आहे. पण आरक्षण कशासाठी आहे हे लोकांना माहित व्हावे. खरेदी, विक्री होउ नये. लोकांना लक्षात यावे की ही जागा महापालिकेची आहे हा एवढाच ह्याच्यामधला अर्थ आहे. म्हणून आम्ही ते समजावून सांगितल्यानंतर बजेट प्रोव्हीजन झाले आणि आता टेंडर काढायला सांगितले.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ही सूचना तुम्ही मा. महासभेत का आणली नाही. ठराव असा पास केला. तर तुम्ही त्याच्यात दुरूस्ती का केली नाही.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नगरपालिका असताना मा. महासभेतच सांगण्यात आले होते.

**रिटा शाह :-**

साहेब, तुम्ही अर्धवट माहिती देता. जेव्हर हा बोर्डाचा मुद्दा उचलला होता. तेव्हा मी सांगितले होते जे जमिनीचे मालक आहेत त्यांना तुम्ही नोटीस पाठविली का? तुमच्या जमिनीवर तुम्ही बोर्ड लावा. कारण आपल्याकडे हे नक्की नाही की, ह्या जमिनीचा मालक कोण आणि तुम्ही कोणाला नोटीस पाठवणार. आणि आपल्याकडे तयारी आहे का? ह्या जमिनीचा मालक कोण आहे. तुम्ही टेंडर काढले आहे ते टेंडर बरोबर आहे. मी तेव्हा सांगितले होते की तुम्ही त्यांना नोटीस पाठवा. आणि नोटीसमध्ये नमुद करा की तुम्ही स्वतः बोर्ड लावा कारण नगरपालिकेने का एवढा खर्च करायचा? तुम्ही त्यांना नोटीस पाठवा आणि नोटीस पाठवल्यानंतरही त्यांनी बोर्ड लावले नाही तर तुम्ही त्यांना पॅनलटी लावून टाका व त्यांच्याकडून पैसे वसुल करा.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आरक्षणाच्या जमिनीमधले मालकी हक्कांचे कागदपत्र तलाठ्याकडून मागवले आहे. जे मालक सातबा-यावर असतील त्यांनाच नोटीस काढणार. त्यानंतर व्यवहार किती झाले आहेत ते सांगता येणार नाही.

**रिटा शाह :-**

तेव्हा मा. उपमहापौर ह्यांनी मुद्दा उचलला होता की, सातबा-यावर नाव आहे ती लोक येथे दिसतच नाही. ते खेडूत येथे नाही आहे. मग तुम्ही नोटीस कुणाकडे पाठवणार.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हीच एक अडचण आहे.

**रिटा शाह :-**

तुम्ही एवढे टेंडर काढले आहे. तेव्ही मी मुद्दा उचलला होता की, तुम्ही नोटीस पाठवा. आणि नोटीसीवर त्यांनी बोर्ड लावला नाही तर तुम्ही त्यांना पेनॅल्टी लावा. बोर्ड आपण लावायचे व नंतर पेनॅल्टीसकट त्यांच्याकडून रक्कम वसूल ही करायचे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ह्यावर मार्ग असा निघाला की, पेपरला नोटीस द्या की ह्या ह्या आरक्षण सर्वे नंबरचे मालकांना माहिती व्हावे म्हणून महापालिका ह्या आरक्षणावर बोर्ड लावते. असे पब्लिक नोटीस द्यायचे आणि लावायचे. कारण मालक शोधले तर सापडत नाही.

**रिटा शाह :-**

पब्लिक नोटीसमध्ये तुम्ही असे नमुद करा की तुमच्या आरक्षित जागेवर तुम्ही स्वतःचे बोर्ड लावा की माझी ही जमिन आरक्षणामध्ये आहे. त्यांनी बोर्ड लावले नाही तर तुम्ही त्यांच्याकडून पेनॅल्टी वसुल करा. आपण खर्च का करायचा?

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, विकास आराखडा १९९७ ला मंजूर झाला. व तो विकास आराखडा मंजूर झाल्यानंतर तुम्ही भुधारकांना नोटीसा पाठवल्या का, तुमची जमीन आरक्षणाखाली आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २२, २१ नुसार या मिरा भाईंदर शहरासाठी विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आणि प्रसिद्ध केल्यानंतर त्याला मोठया प्रमाणात आपण प्रसिद्धी दिली होती. संबंधितांना त्यावेळी जे जमीन मालक होते त्यांना यासर्व जागेची कल्पना होती. अनेक निवेदने येथे आली होती. त्याच्यावर चर्चा झाली. त्याच्यावर हेअरींग झाले आणि हे सर्व प्रक्रिया संबंधित मालकांना आहे. माहिती नाही अशातला भाग नाही. कारण तेव्हा मी मुख्याधिकारी म्हणून काम करीत होतो. मला याबाबतीतली माहिती आहे की त्या जमीन मालकांना माहिती आहे की माझी जागा ह्या अमुक कारणांसाठी आरक्षित झालेली आहे त्याच्याकरिता ऑब्जेकशन आले व त्याच्यावर हेअरींग झालेली आहे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

साहेब सगळयांनीच काय ऑब्जेकशन दिलेले नाही. तुम्ही आपल्या नगरपालिकेने त्या भूधारकांना नोटीसा काढल्या का? तुमची जमीन आमच्या आरक्षणामध्ये आलेली आहे.

**रिटा शाह :-**

साहेब बोलले की, १९९७ मध्ये असे झाले तसे झाले. तेव्ही मी ही स्वतः नगरसेविका होती. मला ही माहिती आहे तेव्हा आपले टाउन प्लानिंग केव्हा आले व केव्हा सॅक्शन झाले. येथे जेवढे जमीन मालक आहेत त्यांना ही माहिती आहे की आपल्याकडे काय घडले आहे. माझा मुद्दा एवढा आहे की आरक्षणाचा बोर्ड लावण्याच्या अंतर्गत आपण जो खर्च करत आहोत. तो खर्च त्या जमीन मालकांकडून आपण वसूल करायचा व महानगरपालिकेने तो खर्च करायचा नाही. आपण त्या जमीन मालकांना नोटीसी पाठवायचा असा मुद्दा आहे. बोर्ड लावायचा नाही असा घोलमोल मी करत नाही.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ज्यांची जमीन गेली आहे ते त्या जागेवर बोर्ड लावणार नाही. त्यांची जमीन आपण आरक्षणाखाली घेतो. मग ते बोर्ड कसे काय लावणार. एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ च्या कलमाप्रमाणे पहिले जमीन वापरणे असे पब्लिकेशन पेपरला केले होते. सगळया जमीन मालकांना डेव्हलपमेंट प्लान बनवत असताना नोटीस देत नाही. पेपरला प्रसिद्धीकरण केलेले असते आणि हे झाल्यानंतर ऑब्जेकशन सॅक्शन मागवतो. इन्डीव्हयूजव्हल नोटीस देण्याची तरतूद कायद्यामध्ये नाही. त्यामुळे डेव्हलपमेंट बनवत असताना तुमच्या जमिनीवर आरक्षण आहे हे कळविण्याची आवश्यकता कायद्यामध्ये नाही आणि गव्हर्नमेंट ही पाळत नाही. नोटीफिकेशन म्हणजे सगळया लोकांना माहिती झाले असे गृहीत धरले जाते. पेपरला ही जाहिरात आहे आणि नोटीफिकेशनही आहे. आणि कायद्यात जी प्रोव्हीजन आहे ती याप्रमाणे आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

माझा प्रश्न तो नव्हता, विकास आराखडा मंजूर झाल्यानंतर, का मंजूर करताना.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मंजूर झाल्यानंतर सुद्धा आम्ही कळवत नाही. ज्यांनी त्यांनी पब्लिकेशन झाल्यानंतर प्लान येउन बघायचे की माझ्या जमिनीवर आरक्षण आहे का नाही. आणि ऑब्जेकशन घ्यायचे तसे ऑब्जेकशन पाच सहा हजार आले होते असे इंडीव्हयुजवल तुमच्या जमिनीवर आरक्षण केले आहे असे आम्ही कधीही

कळवत नाही आणिं महाराष्ट्रात कुठेही अशी प्रोसीजर फॉलप होत नाही. कायदयाप्रमाणे पब्लिक नोटीस आणि नोटीफिकेशन.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सभापती साहेब पान नं. ३३ ठराव क्र. ११४ भूसंपादन करणे कामी जो अधिकारी नेमणेबाबत आपण जो ठराव मागच्या सभापतीच्या अधिपत्याखाली मंजुर केला आणि ठेका पध्दतीने एक अधिकारी आपण या कामासाठी नियुक्त करणार आहोत आणि हया अधिका-याच्या कक्षेत भूसंपादन करणे शासकीय किंवा खाजगी जमिनी आरक्षणातल्या संपादन करुन आणि ते संपादन करताना टी.डी.आर. देणे किंवा इतर काही करार करणे, ती जमीन विकत घेणे हे सर्व अधिकारी त्या अधिका-याला असतील तर एखादा समजा ठेका पध्दतीने घेतलेला आणिकारी हयाला टी.डी.आर. देण्याचे किंवा रास्त अधिकार कायदयामध्ये असू शकतील का?

**चंद्रकांत वैती :-**

या विषयात मी बोलू इच्छितो की, जेवढी रिर्झवेशन आहेत हया रिर्झवेशनच्या बाबतीमध्ये जमीन ॲक्वायर करण्यासाठी आपण एका अधिका-याची नेमणूक करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे नेमणूक झाली आणि सन्मा. सभापती साहेबांनी काल संबंधित अधिका-यांची हेड ऑफ द डिपार्टमेन्टची बैठक घेउन सर्व माहिती जमा करुन जे आरक्षण आहे. त्या आरक्षणाची सद्यस्थिती काय आहे. याच्यात किती जमीन उर्वरित आहे. ह्याच्यात बांधकाम काय झाले आहे आणि आपल्याला ताब्यात घेण्यासाठी काय करता येईल. या विषयी चर्चा झाली आणि सर्व आरक्षणावरती आपण महापालिकेचे आरक्षण आहे अशाप्रकारे बोर्ड लावणार आहोत. हयाच्यावर स्थानिक जे मालक असेल मालकी हक्क सिध्द करणे हा फार मोठा घोळाचा प्रश्न आहे. कारण ब-याच जमिनी विकल्या गेल्या आहेत आणि उता-यावर मुळ मालकाचा नाव आहे आणि दोन तीन व्यवहार झालेले आहेत. मग शेवटी हया लोकांना नोटीस काढायचे ठरलेले आहे आणि जमीन ॲक्वायर फक्त हे रिर्झवेशन आपल्या ताब्यात घेण्यासंदर्भात आपण सुरुवात त्या अधिका-याच्या मार्फत करणार आहोत. मात्र ह्याच्यावर अंतिम निर्णय हे कमिशनर साहेबांच्या माध्यमातून घेतले जातील अशी ही काल चर्चा झाली होती आणि हा विषय पुन्हा आपण स्थायी समितीसमोर आणावा असे प्रयत्न सुरु आहेत.

**अशोक पाटील :-**

म्हणजे ते अशिकारी प्रोसेस पूर्ण करणार व बाकीचे अधिकार त्यांना काही नसणार. मंजूरी कमिशनर साहेबांची असेल तर आतापर्यंत आपण किती जमिनी ताब्यात घेतले आहे व त्याची प्रोसेस वगैरे काय केली का? उदा. नेताजी सुभाषचंद्र क्रिडांगण, भाईंदर (पूर्व) चौपाटी, मिरारोड स्मशान भूमी, डंपिंग ग्राउन्ड, आर.ओ.बी.च्या रस्त्यांच्या अंर्तगत येणारे जमिनी.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.) :-**

चौपाटीची जागा नेताजी सुभाषचंद्र बोस क्रिडांगणाची जागा आणि इतर जागेचा प्रस्ताव आपणं मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवलेला आहे आणि जिल्हाधिकारी ह्या स्तरावर आपला प्रोसेस चालू आहे आणि ह्या प्रोसेसला आधिक गती देण्याकरिता आपण श्री. मोरे भूसंपादन आधिकारी हे महसूल विभागाशी आणि त्या विभागाशी संबंधित होते. भूसंपादन विभागाशी संबंधित होते त्यांना आपण येथे प्रतिनियुक्तीवर घेणार आहोत आणि आपण त्यांच्यावर त्या कामाची जबाबदारी सोपविली आहे. हे आपण त्या विभागाशी तात्काळ संपर्क साधून ज्या जागा आरक्षणा अंतर्गत आहे ते ताब्यात घेणार आहोत.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब मागच्या वेळी आपण श्री. एम. एच. मोरे उपजिल्हाधिकारी निवृत्त हयांना पाच महिन्याकरिता आपण हंगामी स्वरुपाकरिता नेमलेले आहे. ते कुठे बसतात? काय करतात? आतापर्यत त्यांनी काय काम केले आहे व ते आता येथे सभागृहात उपस्थित आहेत का?

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सा़े.):-**

गेल्या दोन ते तीन सभेंत असा निर्णय झालेला आहे. त्या त्या विभागाच्या विभाग प्रमुखानेच सभेत हजर राहावे आणि त्या विभागाचे प्रमुख श्री. शेंडे साहेब आहेत आणि श्री. शेंडे साहेब येथे हजर आहेत.

**अशोक पाटील :-**

म्हणजे ते अधिकारी श्री. शेंडे साहेब हयांच्या अधिपत्याखाली काम करणार असे आहे का ?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

ते अधिकारी श्री. शेंडे साहेब यांच्या अधिपत्याखाली काम करतात आणि त्यांना त्यांनी जे सांगितलेले काम आहे त्याची जबाबदारी त्यांच्यावर वाटून दिलेली आहे.

**आसिफ शेख :-**

श्री. शेंडे साहेबांनी हया विषयावर माहिती दयावी.

**श्री. शेंडे :-**

हया पूर्वीच्या स्थायी समितीच्या ठरावाप्रमाणे त्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे आणि ते चौथ्या माळयावर आमच्या ऑफिसमध्ये आमच्याबरोबर बसतात. ते कामावर रुजु झाल्यानंतर सरकारी जागेचे मागणीचे जे प्रकरण होते त्या सरकारी जागेवर १९९४ मध्ये सात शासकीय जागा आपण ताब्यात घेतलेल्या होत्या. त्याच्यापैकी पाच जागा हस्तांतरीत केलेल्या आहेत. दोन जागांचा विकास व्हायचा आहे. त्याची सात बा-यावर आपल्या नावावर नोंद व्हायची आहे. त्याची सात प्रपोझल आमच्या सहकार्याने तयार केलेले आहे आणि त्याच्यानंतर अजून दहा जागा मागणीचे प्रपोझल आपण जिल्हाधिका-याकडे पाठविलेले आहे. त्याचा पाठपुरावासुध्दा केलेला आहे. त्याची मोजणी फी भरण्यासाठी त्यांनी आपल्याला कळविलेले आहे व त्याच्यासोबत देखील त्यांनी इतर कागदपत्रे मागविलेले आहे. ते कागदपत्र गोळा करण्याचे काम चालू आहे. अशाप्रकारे ते नेहमी आमच्याशी संपर्क साधून काम करत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सर्वे नं. २५ आणि ६५ डंपिंग ग्राउन्डसाठी आहे. त्याचे पण काम चालू आहे का?

**श्री. शेंडे :-**

जागा आपण ऑलरेडी ताब्यात घेतलेली आहे. त्याचे मायर मोडीफिकेशनचे काम चालू आहे. त्याचे नोटीफिकेशन झालेले होते. त्याचे ऑब्जेक्शन सजेशन कॉल पास झाले होते. एम.आर.टी.पी. ॲक्टच्या कलम ३७ प्रमाणे ते ऑब्जेक्शन आपल्याला जे आलेले आहेत त्याची हेअरींग सध्या आम्ही घ्यायची आहे व त्या हेअरींगचा प्रोग्राम आम्ही सध्या तयार करीत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

डंपिंग ग्राउंडची सध्या स्थिती काय आहे? जमिनीच्या आरक्षणाच्या अनुषंगाने विचारत आहे.

**कल्याण केळकर(मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब कोणत्या प्रश्नावर जेव्हा आपण इतिवृत्तांतावर चर्चा करत आहोत तेव्हा इतिवृत्तांतात काही दुरुस्ती असेल तर ते सुचवायचे असते. किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती जर आली असेल किंवा उपप्रश्न विचारायचे भरपूर चर्चा करायची अशी तरतूद कुठेही सभेच्या कामकाजात नाही आणि हयाच्यामध्ये जर काही दुरुस्ती करायची असेल तेच सभागृहाने सूचित करायचे असते आणि सदस्यांनी सूचित करायचे असते.

**चंद्रकांत वैती :-**

पान नं. ३६ वर महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता हया पदाच्या संवगार्स मंजूरी देणे हयाच्यामध्ये सन्मा. स्थायी सदस्य आसिफ शेख साहेब व मिलन म्हात्रे साहेब हे सूचक आणि अनुमोदन होते. हयाच्यामध्ये आपण् अनुसूचित जमातीचे अभियंते नेमणार होतो. तर त्याच्यामध्ये आपण स्थापत्य अभियांत्रिकी पदवीधर आणि डिप्लोमा होल्डर असे दोन तर त्या ठिकाणी दोन आणि तीन अशाप्रकारचा ठराव होता तर त्यामध्ये थोडी सुधारणा करुन पदवीधर एक आणि डिप्लोमा होल्डर चार असे करायचे आहे आणि पदवीकामध्ये चार आणि भटक्या जमातीमध्ये आपण पदवीधर एक होता. तिथे पदवीधर दोन करायचे आणि डिप्लोमा होल्डर आहे. तिथे एक आपण लिहिले होते.

**आसिफ शेख :-**

टिपणी काय होती? ती आपल्याकडे आहे का?

**दिपक खांबीत :-**

आपण आणि मिलन म्हात्रे हयांनी अशी सूचना मांडली होती की जसे सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती साहेब हयांनी जशी सूचना केली होती तशी दुरुस्ती करावी व टिपणीच्या आधारे माहिती घ्यावी.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य वैतीजी हयांनी सांगितल्याप्रमाणे ठराव सुधारणा करण्यात यावी. पण टिपणीमध्ये आणखीन पुढे काय होते की हा विषय पुन्हा महासभेत घेण्यात यावा. असे मला वाटते. टिपणीच्या शेवटी लिहिले तर तो महासभेपुढे विषय घेण्यात यावा अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, आपण महापालिकेतर्फे कुठलाही ठराव झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी किती दिवसात व्हायला पाहिजे असा काय नियम आहे का? पाईप शिफ्टिंग करणेसाठी जे पत्र दिले होते. नागरिकांनी तर अजूनही त्याचे पैसे घेतले जात नाही आणि मला वाटते हा ठराव गेल्या सभेत केला त्याच्या पंधरा वीस दिवस अगोदर पाणी विभागात पत्र दिलेले आहे आणि पाणी विभाग त्याबाबत कुठलीही चौकशी न करता पैसे घेत नाही आणि का घेतले जात नाही हे मला समजत नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.) :-**

पाणी पुरवठा विभाग गेल्या सभेमध्ये सर्वानुमते निर्णय घेण्यात आला होता की पाचशे रफपये सरसकट चार्जेस घेण्याचे ठरले होते. तथापि का घेतला जात नाही हयाचा खुलासा करावा.

**निकम :-**

मी आपल्याशी संपर्क साधला होतो की ज्यांचे ट्रान्सफर करायचे असतील त्यांचे ॲप्लीकेशन माझ्याकडे दया. मी ताबडतोब मंजूर करुन देतो.

**शरद पाटील :-**

ते आपल्याकडे द्यायचे का, पवारांकडे द्यायचे का, दशोरे साहेबांकडे द्यायचे. दशोरे साहेबांनी पवारांना सांगितले. पवारांकडे माझे कधीच पत्र गेले आहे. मी प्लंबरकडे दिलेले आहे आणि प्लंबरने त्याचा रिपोर्ट अजून कुठेही दिलेला नाही असे चव्हाणांचे अजून आमच्याकडे पत्र आलेले नाही.

**निकम :-**

मिस्त्री पाठवून बोलावून घेतो.

**शरद पाटील :-**

वीस वीस दिवस झाले आहे. त्याच्यावर त्यांनी पत्र दिले आहे. तुमच्याकडून रिपोर्ट का येत नाही.

**निकम :-**

आजच्या आज मी बोलावून घेतो आणि पत्र देण्यास सांगतो.

**मा. सभापती :-**

पाणी पुरवठ्याच्या विभागाने तात्काळ कार्यवाही करावी.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब आपण आता सन्मा. सदस्य शरद पाटील ह्यांनी मुद्दा उपस्थित केला आणि आपण ऑडर दिली की तात्काळ कार्यवाही आजच्या आज करून घ्या. जे विषय सभागृहापुढे येणार तेव्हा तुम्ही सांगणार की तात्काळ करा आणि जे विषय सभागृपुढे येणार नाही त्याचे तुम्ही काय करणार? मला वाटते आपण जो ठराव ह्याठिकाणी पास करतो. मी आपल्याला मागेपण सांगितले स्थायी समिती ही महानगरपालिकेची महत्त्वाची समिती आहे आणि ही समिती शहराचे पूर्ण व्यवस्थापन करत असते. त्यामुळे एकदा ठराव पास झाल्यानंतर तो अधिका-यावर बंधनकारक असेल आणि एक अधिकारी सुट्टीवर गेला असेल तर दुसरा जो अधिकारी असेल त्याने त्या ठरावावर अंमलबजावणी करायची. त्याने वरिष्ठ अधिकारी यायची वाट बघायला नाही पाहिजे. आपण सगळयांना निर्देश द्या की, जे ठराव येथे पास होतात त्याची अंमलबजावणी बंधनकारक आहे. ते सुट्टीवर गेले किंवा आमच्याकडे चावी नाही. ह्यासर्व गोष्टी नाही व्हायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

ह्याच्यामध्ये सुद्धा पक्षपात होतो. वैयक्तिक नळ कनेक्शनचा येथे ठराव झाला आणि दुस-या दिवसापासून वैयक्तिक कनेक्शन चालू झाली. अकरा आणि बारा नंबरच्या वार्डमध्ये ठराव येथे झाला. त्या ठरावाची अंमलबजावणी झाली ते पत्र त्याच्याकडे गेले का नाही ते माहित नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.) :-**

सन्मा. सभापती महोदयांनी ह्यामध्ये रूलिंग दिलेली आहे की, संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी. आणि आजपासून संबंधित विभागाने जेवढे प्रकरणे असेल ते आपल्या गेल्या सभेत ठरले आहे की पाचशे रूपये घेउन त्यावर तात्काळ शिफ्टिंगची कायर्वाही करावी. त्याप्रमाणे त्यांनी

कार्यवाही करावी आणि पुढीज सभेत त्यांनी आढावा ठेवावा की गेल्या आठवडयात किती शिफ्ट केले. त्यामध्ये दशोरे साहेब आजारी आहे किंवा अन्य कोणी आजारी आहे हे कारण चालणार नाही. यासंबंधी संबंधितांनी दखल घ्यावी.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब सभा सुरू करण्यापूर्वी केळकर साहेबांनी आता जे बोलले की मागच्या दोन तीन सभेपासून विभागप्रमुख आपल्याकडे उपस्थित राहणार. तर विभाग प्रमुखांमध्ये नेमके कोणते, मिरा रोडचे विभागप्रमुख, पुर्वेचे किंवा पश्चिमेचे असे कोणते. आपल्याकडे त्या त्या विभागाचे वेगवेगळे कर्मचारी उपस्थित आहेत. बांधकामाचे तीन चार आहे. ए.टी.पी. चे दोन आहेत. आपण हे बघावे. बांधकामाचे सिटी इंजिनिअर उपस्थित राहणार का इतर अधिकारी उपस्थित राहणार. आरोग्याचे जसे बावस्कर साहेब उपस्थित राहणार तसे आणखीन त्याविभागाचे दुसरे अधिकरी उपस्थित राहणार.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

आरोग्य विभागातून बावस्कर साहेब उपस्थित राहतील आणि बांधकाम विभागातून सिटी इंजिनिअर उपस्थित राहतील.

**रिटा शाह :-**

दुसरे अधिकारी उपस्थित राहतील का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

त्यांची आवश्यकता वाटल्यास त्यांना बोलावून घेण्यात येईल.

**रिटा शाह :-**

माझे ऑब्जेकशन नाही. आपण सर्वांनाच बोलवा.

**मा. सभापती :-**

स्थायी समितीमध्ये ठरवा जर सर्व अधिकाऱ्यांना बोलवायचे असेल तर सर्व अधिकाऱ्यांना बोलूया.

**रिटा शाह :-**

मी हा मुद्दा उपस्थित का केला आहे ते आपल्याला माहित आहे का? जर कोण अधिकारी दिसला नाही व मी त्याच्या बद्दल विचारले तर आम्हाला असे उत्तर मिळते की स्थायी समितीमध्ये हेड ऑफ द डिपार्टमेंटनेच उपस्थित राहायचे असे ठरले आहे. असे गोलमोल उत्तर नाही पाहिजे. उपस्थित करायचे असेल तर सर्वांनाच उपस्थित करा.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब यामध्ये माझे असे स्पष्ट म्हणणे आहे की जे हेड ऑफ द डिपार्टमेंट आहे ते आणि त्यांच्याबरोबर काम करणारे ज्यांना विभाग वाटण्यात आले भाईंदर पूर्व, पश्चिम असे सगळया संबंधित लोकांना सभेला बोलवा.

**रिटा शाह :-**

आणि जे न कळविता गैरहजर राहतात त्यांच्यावर आपण कार्यवाही देखील करा.

**मोहन पाटील :-**

हेड ऑफ डिपार्टमेंटचे जे अधिकारी आहेत आणि त्या अधिकाऱ्यांना जे अधिकारी पूरक माहिती देउ शकतील असे अधिकारी पाहिजे. पूरक माहिती जर देउ शकत नाही तर त्याचा उपयोग काय? समजा ए.टी.टी.पी. चे अधिकारी शेंडे साहेब आहेत त्यांना अशी आवश्यकता वाटली ह्याठिकाणी आम्हाला ए.टी.पी. पाहिजे त्यांनी त्यांना बोलवायचे. कारण तो विषय तिथे येणार आहे जर त्यांना आवश्यकता असेल तर. पाणी पुरवठ्याचे दशोरे आहेत आणि त्यांना आवश्यकता वाटली निकम किंवा कांबळे हे असा प्रश्न उपस्थित झाल्यावर त्याची माहिती देउ शकतील तर त्यांनी त्यांना बोलावले पाहिजे. त्यांच्या अधिपत्याखाली त्यांची सूचना त्यांनी तुम्हाला द्यावी. जे कमीशनर म्हणून सूचना द्यावी की आम्हाला ह्या ठिकाणी ह्या अधिकाऱ्याची आवश्यकता लागणार आहे. आणि ज्या डिपार्टमेंटचा विषय नाही त्या ठिकाणचे अधिकारी आले पाहिजे हा विषय नाही आहे. मग समला त्याचा प्रोसीडिंगमध्ये विषय आला असेल व त्याविषयावर चर्चा करायची असेल तर त्यांनी चर्चा करावी ते आपल्या अधिपत्याखाली.

**रिटा शाह :-**

साहेब, मुद्दा तसा नाही. माझा विरोध नाही की आपण ह्याला बोलवा त्याला बोलवा. सर्वांनाच बोलव. पण जेव्हा कुठलाही नगरसेवक ज्या अधिकाऱ्याबद्दल विचारणार आहे त्याला माहित पडल्यावर

तो गैरहजर राहतो आणि आम्ही विचारल्यावर आम्हाला असे उत्तर मिळते की आता असे ठरले आहे. आपण सर्वांनाच बोलवा आम्हाला ज्यांना प्रश्न विचारायचे आहे त्यांना आम्ही विचारू.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

जो निणर्य स्थायी समितीने आता घेतला आहे. त्याच्याशी आपण स्ट्रीक राहावे कारण ह्याआधी देखील निर्णय स्थायी समितीनेच घेतला होता.

**आसिफ शेख :-**

आता जो निर्णय झाला तो सर्वांना बंधनकारक आहे.

**प्रकरण क्र. १४७ :-**

दिनांक ३०/०८/२००३ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र.**

दि. ३०/०८/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत सिताराम वैती. अनुमोदन :- श्री. अशोक ब. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४८ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, हया ठिकाणी हा विषय मागच्या वेळेला आला होता. व विषय आल्यानंतर सामाजिक संस्थाना, शैक्षणिक संस्थाना, आपण ते मैदान उपलब्ध करायचे आणि ते मैदान उपलब्ध करायचे आणि ते मैदान उपलब्ध करत असताना त्याठिकाणी शाळा चालते आणि त्या शाळेच्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना शिक्षणामध्ये अडथळे निमार्ण होतील अशाप्रकारचे वातावरण तिथे निर्मा ण होते. अशी चर्चा सुरू होते. आणि वस्तुस्थितीमध्ये तो भाग आहे. मागच्या वेळेला आपण हाच जत्रोत्सवाचा कार्यक्रम केला होता. तो कार्यक्रम करत असताना त्याच ठिकाणी सर्व कचरा, त्यांनी केलेले जेवण ते सर्व कुजलेली होती. आणि त्याठिकाणी संपूर्णपणे घाण झालेली होती. त्यामुळे दुर्गंधी पसरली होती. त्या दुर्गंधीमुळे उंदरांचा मज्जाव झाला व वृक्षारोपन केलेली जी झाडे होती ती झाडे संर्पूणपणे उंदराने खाउन टाकली होती. आणि ती झाडे मेली. अशा पद्धतीचे वातावरण निर्माण झाले आणि एखाद्या संस्थेला दिले पाहिजे का नाही दिले पाहिजे. अशी चर्चा सुरू झाली आणि दुसरा विषय असा की, हा विषय प्रशासनाचा विषय आहे. उपआयुक्त साहेब मी तुम्हाला सांगतो हा विषय बॉडीचा विषय नाही ॲडमीनिस्ट्रेशनचा विषय आहे. ज्या आपल्या सार्वजनिक प्रापर्टी आहेत आणि ह्या सार्वजनिक ठिकाणी कोणत्या पद्धतीने त्याची निगा राखता आली पाहिजे. सुव्यवस्था ठेवता आली पाहिजे अशा पद्धतीचा तो विषय होता. आणि तो विषय प्रशासनाने पुन्हा स्थायी समितीसमोर आणला आणि त्याचा निणर्य झाला आणि निर्णय झाल्यानंतर पुन्हा हा विषय स्थायी समितीपुढे आणला. आमच्या आदरणीय सभापती साहेबांनी सांगितले की कोणत्याही प्रकारचा वेळ अधिका-यांचा व सदस्यांचा वाया जाता कामा नये. अशापद्धतीने जे विषय प्रशासनाचा आहे व तो विषय प्रशासनाने हाताळायचा आहे आणि न हाताळता कोणत्या बेसवर कोणत्या कायद्याने पुन्हा हा विषय स्थायी समितीसमोर आणता. तुम्हाला प्रशासन चालवायचे आहे व प्रशासन चालवताना आपण कुठेतरी कुचरता, कमी पडतोय असे असेल व ज्या ज्यावेळी तुम्ही अधिका-यांची मागणी केली व आम्ही तुम्हाला सक्षम अधिकारी दिलेले आहे. ते प्रतिनियुक्तीवर असू दे. ठेका पद्धतीने असू दे. नव्याने स्टाफ मंजूर झाला आहे तो स्टाफ यायला पाहिजे आणि तो स्टाफ तुमच्याकडे मागविलेला आहे. आणि ही पद्धत तुम्ही ह्याठिकाणी मागवलेली आहे. ही पद्धत तुम्ही कोणत्या कायद्याने आणली आहे त्याचा तपशील आपण आम्हाला द्यावा. एकाबाजूने आपण त्यांना परवानगी देतो. वती परवानगी कोणी दिली व परवानगी देताना त्या संबंधित खात्याचा अभिप्राय आला होता का नव्हता? मग त्या संबंधित खात्याने काम केले, ह्याचा संपूर्ण

तपशिल, माहिती सभागृहापुढे आपण द्यावी आणि अशा पद्धतीचे विषय हयाच्यापुढे आपण आणू नये. सभापती महोदय ह्या विषयाची आपण संपूर्ण माहिती घ्या. आम्ही मागच्या वेळेला असे विषय आणले. आणले नाहीत अशातला विषय नाही. आणि विषय आणताना त्या त्यावेळी आम्ही माहिती प्रशासनाला दिलेली आहे. मग कोणतेही विषय तुम्ही चालवायला सक्षम नसाल आणि तो विषय तुम्ही सभागृहापुढे आणला आणि सदस्यांचा व प्रशासनाचा वेळ घालवता आणि असा वेळ घालवता कामा नये. कृपया ह्याच्यामध्ये सभापती साहेब, उपआयुक्त साहेब अशी एक पद्धत ठेवून द्या, कोणत्याही सदस्याचे नाव त्याठिकाणी येता कामा नये. मग त्या सदस्याचे नाव त्याठिकाणी आल्यानंतर त्या सदस्यांच्या प्रस्तावावर कोणत्या सदस्यांनी कोणत्याप्रकारे भूमिका घेतली आणि त्याचा वेगळा संदेश सभागृहाच्या बाहेर जातो आणि तो सभागृहाच्या बाहेर गेल्यानंतर जी वेगळी रणनीती आम्ही जेव्हा एकोप्याने एकत्र येतो त्यावेळी बीजेपी, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, जनता दल कोणत्या बाजूने आहे असा विषय त्या ठिकाणी निर्माण होतो आणि तो विषय नसताना निर्माण होतो. कृपया आपण हा विषय कोणत्या बेसवर ह्या ठिकाणी आणलात त्याचे उत्तर मला ह्या ठिकाणी द्या आणि कोणत्या पद्धतीने परवानगी दिली आणि ती पुन्हा का नाकारली आणि त्याचा प्रस्ताव तुमच्याकडे मागच्या समितीत आला होता ह्याचा आपण सभापती महोदय खुलासा करावा आणि नंतर बाकीच्या सदस्यांच्या सूचना घ्याव्यात. ही विनंती करतो.

**दिपक खांबीत :-**

सभापती महोदय, ठराव क्र. ११० गेल्यावर्षी आपण ठराव मंजूर केला होता. सदरच्या विषयी सामाजिक संस्थांना देण्याचा ठराव मंजूर केला होता. त्यानुसार परवानगी दिली होती. आणि यंदाही परवानगी दिली सामाजिक संस्था असल्यामुळे गेल्यावर्षी ह्यासंस्थेला परवानगी दिल्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने गैरसोय झाली होती. याबाबत मा. प्रभात पाटील मॅडम ह्यांनी पत्र देउन ज्या ज्या गैरसोयी आहेत त्याची यादी दिलेली आहे. त्यामुळे हा विषय पुन्हा आणि आणखीन इतर नगरसेवकांचे ह्याबाबत पत्रही आले आहे, हा विषय गंभीर वाटला म्हणून पुन्हा स्थायी समिती समोर आणलेला आहे आणि आपल्याला निणर्य घ्यायचा आहे कारण आपणच तो ठराव केलेला आहे.

**रिटा शाह :-**

आता आपण बोलले की आणखीन दोन तीन नगरसेवकांचे पत्र त्याबद्दलचे आहे. मग आपण एकाच नगरसेवकाचे नाव टाकून हे सर्व राजकारण कशाला करता.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेब माझे असे ह्याठिकाणी म्हणणे आहे की परवानगी द्यायचे सर्व अधिकार प्रशासनाचे आहे. संबंधित विभागाबरोबर परवानगी देत असते. त्यांना माहित असते कुणाला परवानगी द्यायला पाहिजे किंवा कुणाला नाही द्यायला पाहिजे. मागचे एक प्रकरण सांगतो, चौपाटीवर छट पूजा असते ती दिवाळीच्या नंतर येते. त्यावेळी एक आला त्याला परवानगी दिली त्यानंतर दुसरा आला त्याला परवानगी दिली. ठिक आहे, आम्हाला मान्य आहे, परवानगी द्यायचे अधिकारी प्रशासनाचे आहे. पण प्रशासनाचे काय चालले आहे. तुम लढो हम कपडे संभालते है . अशी जी भूमिका आहे ती भूमिका योग्य नाही. आपल्याला अधिकार आहेत का प्रशासनाला परमीशन द्यायचे. कोणतेही परमीशन आपण स्थायी समिती समोर ठेवणार का? आपण ह्यांना परवानगी देउ का नको देउ. ते तुमचे अधिकार आहेत. तुमच्या अखत्यारीमध्ये तुम्ही परमीशन द्यायला पाहिजे आणि दिलेल्या परमीशनवर तुम्ही स्टीकअप राहायला पाहिजे की मी जी दिलेली परवानगी आहे ती योग्य परवानगी आहे. असे असताना स्थायी समितीच्या खांद्यावर बंदूक ठेवायचे आणि आपण आपले हात वर करायचे ही प्रशासनाची भूमिका योग्य नाही. तर कृपया सभापती साहेब आपण संबंधितांना सांगा की अशाप्रकारे जो आपला कारभार चालला आहे तो चुकीच्या पद्धतीने चालला आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. नगरसेवक आसिफ शेख व मोहन पाटील ह्यांनी जी सूचना केली ती अतिशय योग्य होती की गेल्यावर्षी आपण हा ठराव स्थायी समितीसमोर गेला होता आणि त्याच्यामध्ये आपण सामाजिक संस्थांना ही जागा भाड्याने द्यावी. मात्र भाडयाने देताना आपण त्यात काही अटीशर्ती घालून दिल्या. त्याच्यात असे होते की जेव्हा शाळा चालू असेल तेव्हा कुठल्याही प्रकारचे कार्यक्रम तिथे होता कामा नये. लाउड स्पीकरच्या आवाजाने त्यापरिसरात राहणाऱ्या लोकांना त्रास होउ नये किंवा ध्वनी प्रदुषण वाढू नये. तिथे जी घाण केली जाते आणि हेच मुद्दे सन्मा. नगरसेविका प्रभात पाटील ह्यांनी आपल्याला सांगितलेले आहे आणि आपण जे भाडे ठेवले होतेते नाममात्र रू. २५०/- एवढे ठेवले होते. परत त्या

पुढच्या मुद्यात असे लिहीतात येथे जे वेज, नॉनवेज अशा प्रकारचे स्टॉल लावले जाते. त्या स्टॉलवाल्यांकडून जो उर्वरीत माल असतो तो तिथेच टाकला जातो आणि त्याच्यामुळे तिथे दुर्गंधी येते. तिथे राहणाऱ्या लोकांना अतिशय त्रास होतो. कार्यक्रम संपला की घाण तशीच असते. परत नैसर्गिक विधी आहेत ते विधी देखील तिथेच उरकले जातात आणि त्यामुळे आणखीन ॲडीशनल घाण होते आणि आपण परवानगी छोट्या कार्यक्रमाला द्यायचे ठरविले होते आणि हा कार्यक्रम देखील वीस दिवसांचा आहे. तर संबंधित कार्यक्रम करणाऱ्या आयोजकांना आपण सूचना देउन त्याच्यामध्ये आपल्याला स्वच्छता विषयक आपली धोरणे आणि जे भाडे नाममात्र घेतो ते टिपणीमध्ये आहे. ते आपण दोन हजार पन्नास करणार आहोत. त्यामुळे भाडयाने मागणाऱ्यांची संख्यादेखील कमी होईल. तरी याबाबत योग्य निर्णय घ्यावा आणि आलेल्या सर्व पत्रांचा विचार केला जावा असे माझे मत आहे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, मघाशी मी विषय मांडला प्रशासनाने उत्तर दिले की हा गंभीर विषय आहे. तर हा गंभीर विषय कसा आहे? जर आपल्याकडे गंभीर विषयाचे स्वरूप कोणत्या विषयाला द्यायचे ह्याची व्याख्या आपण सांगा. प्रशासनाने उत्तर दिले की हा विषय गंभीर आहे. ज्या विषयावर चर्चा झाली निर्णय झाला व तो विषय पुन्हा आणला तर हा विषय गंभीर कसा ह्याचा खुलासा प्रशासनाने करावा.

**शरद पाटील :-**

सभापती साहेब माजी सभापतींनी सांगितले की त्याचे डिपॉझिट ही घेउन ठेवलेले आहे आणि सगळे घेतल्यानंतर गेल्या सभेत आपला ठराव झाला. तुम्हाला सर्व कल्पना होती की, ठराव काय पद्धतीचा आहे. तरी सुद्धा तुम्ही त्यांच्याकडून डिपॉझिट घेतल्यानंतर विषय स्थायी समिती समोर आणता. उद्या जर तो कोर्टात गेला तर त्याचे उत्तर कोणाकडे, त्याला जबाबदार कोण? आम्ही स्थायी समिती.

**मा. सभापती :-**

साहेब, भाडे वाढवायचे का नाही तो भाग वेगळाच आहे. आपण त्यांची डिपोझिट घेतल्यानंतर आपण बंधनकारक ठरलेलो आहोत आणि स्थायी समिती समोर ठराव आल्यानंतर आपण सदस्यांनी विरोध करणे हे चुकीचे होईल. पहिल्यांदा जो ठराव झाला त्याप्रमाणे प्रशासनाने अटीशर्ती टाकायला जे वैती साहेबांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही अटीशर्ती द्या आणि त्या पद्धतीने विचार करून तुम्ही त्यांना दया.

**मा. सभापती :-**

आपल्याला द्यायचे आहे पण एवढया दिवसासाठी नाही. हा धंद्यासाठी व्यापार सुरू झाला आहे. आपण घेतो रू. २५०/- आणि ते कमवतात १० हजार रूपये २० हजार रूपये म्हणून आपल्याला त्याच्यावरती चर्चा करायची आहे की, किती दिवसासाठी द्यायचे आहे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, जर प्रशासनाने चुका करायच्या व प्रशासनाने चुकी केल्यावर तो विषय आमच्याकडे आला व स्थायी समितीने निर्णय घेतला की सामाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्थाना आपण ते मैदान उपलब्ध करून द्यायचे हा विषय ठरला. व तो विषय ठरल्यानंतर आपण त्याला परवानगी दिली व परवानगी देताना आपण हा विचार केला का, निकष आपण लावला का? किती दिवसासाठी आपण परवानगी देत आहोत, किती फी घ्यायला पाहिजे, का नाही घ्यायला पाहिजे. हा विषय प्रशासनाच्या संपूर्ण चुकीने आलेला आहे. आणि तुम्ही जर आता सांगत असाल की प्रशासनाने त्याला मान्यता दिलेली आहे आणि त्यात आपण बदल करावा. अशा पद्धतीने आपण आता विषय आणला असेल तो विषय अतिशय चुकीचा आहे. कायद्याने तो विषय घेता येईल का? आणि जर त्यांना परवानगी दिली आणि ते कोर्टात उद्या गेले आणि कोर्टात जर इश्यू निर्माण झाला तर त्याची जबाबदारी सर्वस्वी सभापती साहेब आपण एकटे घेणार का? प्रशासनाला जे निर्णय दिले होते त्याप्रमाणे परवानगी दिली आणि आपल्याला असे आढळले की ते जास्त पैसे कमवताहेत आणि जासत कमवणार आहात आणि ते पैसे कमी घेत आहेत असे आपल्या निर्दशनास आले आहे. उद्या जर ती संस्था कोर्टामध्ये गेली आणि दुष्पपरिणाम झाले तर ते दुष्परिणाम आपण एकटे स्विकारणार आहात का प्रशासन स्विकारेल. ह्याचा आपण खुलासा करावा.

**रिटा शाह :-**

आपण हा ठराव पास करून त्यांना टेंडर दिलेले आहे. भाडे ठरविले आहे त्या हिशोबाने तुम्ही त्यांना दिलेले आहे. पुढे काय झाले ते मला माहित नाही. दोनशे पन्नास रूपये भाडे वसूल करून ते काम करताहेत आणि त्या अंतर्गत वैती साहेबांनी सांगितले की त्यावेळेला ठरवून दिले होते व त्यांनी त्या अटीशतीर्चे उल्लघंन केले व तुमच्याकडे तक्रार आली. त्या तक्रारीचे प्रशासनाने काय ॲक्शन घेतली का? नोटीस पाठवली आहे का? त्या नोटीसीचे त्यांनी उत्तर दिले का? त्यांनी तिथे एवढी घाण केली. शाळेचा असा प्रॉब्लेम निर्माण करून ठेवला आहे. परिसराचा एवढा प्रॉब्लेम केला तर आपल्याकडून नोटीसा किती गेल्या. तुम्ही तिथे नोटीस पाठवून त्यांना सांगितले का तुम्हचे काम आम्ही रद्द करू शकतो.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य आपण चांगली सूचना मांडलेली आहे. परंतू मी जो पहिला प्रस्ताव मांडला आहे त्याचे आपण आम्हाला उत्तर द्यावे की जर सदरची संस्था कायद्याने कोर्टात गेली व कोर्टात गेल्यानंतर जर कोर्टाचे दुष्परिणाम आपल्याला निर्दशनास आले तर सभापती महोदय, का प्रशासन त्याला जबाबदार राहील हयाचा खुलासा आपण करावा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

सन्मा. सभापती महोदय, सभागृह स्थायी समिती दिनांक २३/१/२००३ चे ठराव क्र. ११० वाचून दाखवितो.

(मा. केळकर साो. ह्यांनी ठराव क्र. ११० चे वाचन केले.)

आम्ही सभागृहाचे ऐकले आणि सभागृहमध्यांनी आमच्याकडे कोकणप्रेमी ह्या संस्थेनी ही नोंदणीकृत सामालिक संस्था आहे. रजिस्टर क्र. ६१० ह्यांनी आमच्याकडे पत्र दिले. ही विश्वस्त संस्था आहे. त्यांनी ११/९/२००३ रोजी पत्र दिले की आम्हाला ह्याठिकाणी अशी मालवणी जत्रोत्सव साजरा करावयाचा आहे. ४/११/२००३ ते २३/११/२००३ पर्यंत. तर हे पत्र आल्यानंतर संबंधित विभागाची आमच्याकडे टिपणी आली ती ठरावानुसारच आलेली आहे. ठरावामध्ये आपण स्पष्ट नमुद केलेले आहे की, सुट्टीच्या दिवसात, शाळेच्या सुट्टीच्या दिवसात सामाजिक अगर खाजगी नागरीकास किंवा खाजगी नागरीकास किंवा खाजगी व्यक्तीस देण्यास हरकत नाही. असा आपला ठराव झालेला आहे. त्यानुसार त्यांना हे देण्यात आलेले आहे. याच्याबाबत जर याच्यामध्ये ही दुरूस्ती करायची असेल तर महाराष्ट्र शासनाचे जी.आर. आले आहे, की काणत्याही त-हेचा मैदान ते क्रिडांगणासाठीच त्याची उपलब्धता व्हावी. अन्य कायर्क्रमाला देउ नये. असा जर आपल्याला पुन्हा निर्णय घ्यावयाचा असेल तर सभागृहाने घ्यावा.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आपण आता जर प्रशासनाच्या वतीने सन्मा. उपआयुक्त मुख्यालय ह्यांनी जो खुलासा केलेला आहे. त्यांच्या खुलासामध्ये आणि सभापती साहेब आपण जो खुलासा केला. त्यामध्ये तफावत दिसत आहे. आपण काय सांगितले ते जे वापर करणार ते व्यावसायिक दृष्टीकोनातून करणार आहे. आणि ते जास्त लोकांकडून पैसे वसूल करणार आहे आणि प्रशासन म्हणते की ज्याप्रमाणे ठराव केला आहे त्याप्रमाणे योग्य आहे. तर मला असा ठराव ह्या ठिकाणी करायचा आहे की जेव्हा त्या संस्थेचा अर्ज आपल्याकडे आला तर संस्थेचा अर्ज आल्यानंतर आपण जी रिपोर्टींग केली संबंधित विभागाने, कर्मचा-याने त्यावर रिपोर्टींग केली असेल ना की ह्याचा नक्की उपयोग कशासाठी करणार आहे. अशी रिपोर्टींग केल्यानंतर आपण त्यांना परवानगी दिली असेल ना. म्हणजे आपण परवानगी द्यायची आणि त्याच्यामध्ये वाद निर्माण झाला तर ते सगळ गाठोडं घेउन तुम्ही स्थायी समितीच्या समोर आणायचे आणि त्यांच्या खांद्यावर ठेवायचे. म्हणजे आपल्या खांद्यावरचे ओझे कमी करून आम्हाला जबाबदार ठेवायचे. अशी प्रशासनाची भूमिका आहे का?

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख साहेब आपण ह्या मुद्दयावरतीच चर्चा करतोय. मी काही मुद्दे सांगितले गेल्या वर्षी स्थायी समितीचा ठराव होता आणि त्या ठरावानुसार आपण परवानगी दिलेली आहे. परंतू जेव्हा सन्मा. नगरसेविका प्रभात पाटील ह्यांचे ऑब्जेक्शन आले आणि त्यानंतर त्या कोकणप्रेमी मंडळाला पूरक अशी रोहीदास पाटील आणि इतर नगरसेकांचे पत्र आले. त्याच्यानंतर हा विषय सन्मा. सभापती स्थायी समिती ह्यांनी मा. महापौर मॅडम ह्यांच्याशी चर्चा केली आणि चर्चा

केल्यानंतर मा. महापौर मॅडमनी सांगितले की ह्या विषयावर योग्य तो निर्णय स्थायी समितीत घेण्यात यावा. विषय येथे येताना थोड्याशा वेगळया पद्धतीने आलेला आहे. विषय जर असा आला असता की, आपल्याला ह्या मैदानासाठी भाडेवाढ करायची त्याला अटीशर्ती ठरवायच्या असा विषय आला असता तर तो अधिक संयुक्तिक राहिला असता. आता मात्र विषय आलेला आहे आणि आपण गेल्या वर्षी स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे आपण तो निर्णय घेतला आहे आणि त्या मंडळाला ही मान्यता दिलेली आहे. आमच्या नगरसेविका प्रभात पाटील ह्यांच्याकडून आलेल्या पत्रावरून मुख्य मुद्दे हे आरोग्यविषयक ध्वनीप्रदुषण आणि त्या मैदानास ते आकारले गेलेले अतिशय कमी अशी रक्कम तर हयाच्यामध्ये काहीतरी बदल झाली पाहिजे किंवा ते मैदान आहे त्याच्यावरती फक्त खेळ विषयच कृती झाली पाहिजे असे असेल तर सन्मा. उपआयुक्त केळकर साहेब ह्यांनी सांगितले की शासनाचा जी.आर. आहे. त्या जी.आर. चा आधार घेउन तो विषय स्थायी समिती समोर आणून योग्य तो निर्णय सभागृहाने घ्यावा.

**रिटा शाह :-**

मी जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर आपण अजूनपर्यंत मला दिलेले नाही. ठराव झालेला आहे. त्यांनी ती जागासुद्धा वापरली आणि आपल्याकडे त्याबाबत तक्रार ही आलेली आहे. त्या तक्रारीवर प्रशासनाने काय केले. प्रशासनाने त्यांनी नोटीस पाठवली का? तुम्ही त्यांच्यावर पेनॅल्टी लावली काय? पैसे वसूल केले का?

**(सभागृहात गोंधळ)**

**मोहन पाटील :-**

प्रत्येक सदस्याला आपल्या प्रश्नाचे उत्तर हवे असतात. ते उत्तर न देता अनेक सदस्य प्रश्न विचारतात. त्याच्यामुळे प्रशासनाला नेमकी भूमिका काय करायला पाहिजे. नेमके काम काय करायला पाहिजे. कोणते उत्तर दिले पाहिजे. ह्याच्याबद्दल प्रशासन अवगत राहत नाही आणि आपला कारभार सुरळीत चालत नाही. त्यामुळे मी मघाशी विचारले की आपण कोणत्या आशयाने हा विषय ह्या ठिकाणी आणला आहे. तो विषय आपण नाही आणायला पाहिजे होता. आपण परवानगी देता. त्याच्यात सूचना काय आहे ते बघायला पाहिजे. कारण मागच्या वेळेला ह्याच कारणामुळे तो विषय आला होता, की नुकसान होते आणि आता प्रत्येक सदस्यांनी आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळाल्यानंतर दुसऱ्या सदस्यांनी बोलावे अशी पद्धत आपण ठेवू या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा.) :-**

सन्मा. सदस्य रिटा शाह मॅडमजी आपला ठराव अगदी स्वयंस्पष्ट आहे. ठरावामध्ये दोन ओळींचा ठराव केलेला आहे. सदरचे मैदान सर्वांना कार्यक्रमासाठी न देता फक्त शैक्षणिक, सामाजिक संस्थांना देणे. तसेच सुट्टीच्या दिवसात खाजगी संस्थांना व नागरिकांना देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, मी प्रश्न असा विचारलेला नाही. तुम्ही त्यांना परवानगी द्या. सुट्टीच्या दिवशी काय चालू दिवसातही द्या. पण मी येथे काय विचारले आहे. आपण हे मैदान देताना अटीशर्ती ठेवल्या असतील. ह्या अटीशर्तीचे उल्लंघन झाले तर प्रशासनाने त्याच्यावर काय कार्यवाही केली असे मी विचारत आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा.) :-**

आता गेल्यावर्षी त्यांनी तिथे घाण केली. जे आपण मालवणी जत्रोत्सवासाठी दिले होत आणि त्यांनी कोणत्याही प्रकारचे सहकार्य आपल्याला केलेले नाही. पण ह्या वेळेस त्यांनी आपल्याला लिहून दिले की, आम्ही अशा घाण होऊ देणार नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेब जो ठराव झालेला आहे. त्या ठरावाला सूचक आणि अनुमोदन कोण होते आणि तो ठराव काय झाला आहे?

**मा. सभापती :-**

सुचक आणि अनुमोदन शरद पाटील आणि दिनेश नलावडे आहेत.

**मोहन पाटील :-**

ठराव करताना खाजगी संस्थेचा उल्लेख केलेला नाही आहे.

**आसिफ शेख :-**

ठराव करणारेच म्हणताहेत की आम्ही खाजगी संस्थेचा उल्लेख केलेला नव्हता. हा येथे वाद निर्माण झाला तो कशामुळे तर मला वाटते आपण जी परमीशन दिली आणि वाद निर्माण झाला आणि तुम्ही स्थायी समिती समोर विषय आणला. तर ह्यामध्ये ज्या अटीशर्तीचे उल्लंघन झालेले आहे आणि त्यात ज्या चुका झाल्या आहेत त्या आपण दुरूस्त करा. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती ह्यांनी सांगितले आहे की भाडेवाढ जर करायचे असेल तर जमिनीचा वापर, जागेचा वापर जर व्यावसायिक कारणासाठी जर का कोण करत असेल तर त्याप्रमाणे आपण आपला रेट निश्चित केला पाहिजे व जो ठराव मागच्या स्थायी समितीसमोर झालेला आहे. त्या ठरावावर पुर्नविचार करण्यासाठी भाडेवाढ कोणत्या पद्धतीने करता येईल. हा पुर्नविचार करण्यासाठी हा विषय पुन्हा सभागृहापुढे आणावा, हा संबंधित फक्त एका पर्टीक्यूलर विषयासाठी आणलेला आहे.

**नितीन ठाकूर :-**

हा विषय विषयपत्रिकेवर सविस्तर आणावा.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, हा जो विषय समोर आलेला आहे. ही शाळा माझ्या प्रभागामध्ये येते. कधीपासून जी चर्चा चालू आहे ती ऐकत आहे. मला प्रभात ताईंचे फोन येताहेत. तुम्ही ठराव मांडलेला आहे व तुमची त्याच्यावर सही आहे. पैसे कसे घेतले. दुसऱ्या बाजूने माझ्याकडे कोकणप्रेमी जनता ही आली आणि त्यांनी माझ्याकडे लेटर मागितले. आणि त्यांनी सांगितले पहिजे आमच्याकडून पैसे घेतले आणि आज आम्हाला नामंजूर करताहेत. आम्ही तुमच्याकडे आलेले आहोत. तुम्हचे पत्र आम्हाला पाहिजे. कायद्याकानून प्रमाणे जो ठराव आम्ही तिथे केलेला आहे त्याच्यावर माझी सही आहे. नियमात बसेल त्याप्रमाणे आम्ही ते बघू. मी तुम्हाला सध्या लेटर पॅड देउ शकत नाही. व तसे लेटर दिलेले नाही. व त्यांना तशी परवानगी मी दिलेली नाही. दोन्ही बाजूंनी मी त्या प्रभागाचा सदस्य असल्यामुळे माझी प्रशासनाने फार मोठी कोंडी येथे केलेली आहे. खऱ्या अर्थाने उपआयुक्त साहेब आपण जे सांगता ते आपण येथे परत परत वाचून दाखविले आहे. पण त्या नियमामध्ये आपण जी परवानगी दिली. ती परवानगी बसते का? आणि सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था त्याठिकाणी जे मोकळे मैदान आहे त्या ठिकाणी क्रिकेट सारखे कार्यक्रम तिकीट लावून होतात. त्याला तुम्ही परवानगी देणार आहात का? त्या ठिकाणी क्रिकेट, नाटके व इतर कार्यक्रम होतात. तर तुम्ही ह्या ठिकाणी नेमके कुठले कार्यक्रम बसवणार आहात. प्रशासनाने नक्की कुठले कार्यक्रम बसविले आहे. जर तुम्हीच बरोबर चालविले नाही तर त्याचा परिणाम आमच्यावर होतो आणि आज जो हा विषय आलेला आहे. हा आमच्यामध्ये बीजेपी, कॉग्रस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना ह्यांच्यामध्ये खऱ्या अर्थाने सांगतो उपआयुक्त साहेब आमच्यामध्ये राजकारण केले जाते. प्रत्येक वेळेस असेच दिसून आले. जैन मंदिर नामकरणासाठी ही तोच प्रश्न आला. तुम्ही तुमच्या डोक्यावरचा बॉल आमच्या जाळयात टाकतात असे आसिफ शेख सारखे सांगतात. ते बरोबर आहे. आणि जे खाली उपोषणाला बसतात, मोर्चे येतात आणि त्यांनी मोर्चे आणल्यावर तुम्ही परत आम्हाला काहीतरी सांगायचे व परत आमच्याकडून मोर्चे येणार. म्हणजे आमच्यामध्ये जो चांगला समन्वय आहे. तो समन्वय आमच्याकडून तुटतोय. आता तेच चालू आहे. आम्ही सगळे चांगले आहोत. परंतू प्रशासनाने आपले कामकाज बरोबर न केल्यामुळे हा सर्व परिणाम आम्हाला सहन करावा लागतो. आता जे नियमामध्ये ठराव झालेला आहे. त्यानियमानुसार जे काय होत असेल त्या नियमाप्रमाणे आपण वागा आणि ह्यापुढे जे विषय आहेत ते कमीत कमी आपण चांगले, व्यवस्थित घ्या. कारण तुम्ही एकदा पैसे घेता परत नामंजूर करता. परत तोच विषय स्थायी समितीसमोर आणता.तुमच्या नियमात संपूर्ण रितसर आहे. त्याला बांधिलकी राहून तुम्ही निर्णय घ्या. ह्याचा परिणाम आमच्या समोर देखील येतात. ते देखील आमच्याकडे येतात. माजी सभापती ह्यांच्या अधिपत्याखाली त्यावेळेला निर्णय झालेला आहे. येथे हा जो एवढा मोठा वाद झाला आहे तो फक्त आपल्या निर्णयामुळेच झालेला आहे. नाहीतर हा वाद येथे झाला नसता. जैन मंदिराचा वाद ही अशामुळेच निर्माण झालेला आहे. यापुढे आपण असा काही वाद निर्माण करू नका. आणि आता शहरात दिवाळी सण येतोय. सर्वांना येथे बंधूभावाने भेटू द्या आणि योग्य तो निर्णय आपण आता या ठिकाणी घ्यावा.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, ह्या ठिकाणी नलावडे साहेबांनी चांगली सूचना मांडलेली आहे आणि प्रशासनाच्या ज्या चुका आहेत त्या चूका होता कामा नये. प्रशासन शेवटी आपले आहे. आम्ही

प्रशासनाच्या बरोबर आहोत. थोडे दगड आमच्यावर आले तर ते आपणही स्विकारा. जे राजकीय दगड येतील. ह्या ठिकाणी सभापती महोदयांनी असा विषय मांडला जर त्या ठिकाणी अशा पद्धतीचे व्यावसायिककरण जर होताना दिसते असे सभापती महोदय ह्यांच्या बोलण्यातुन आले. तर मी ह्या ठिकाणी एक सूचना मांडतोय की, आपण हे जे मैदान त्यांना दिलेले आहे ते पाच दिवसाकरिता दयावे आणि त्याची फी तीन हजार रुपये किमान आकारावी अशा पद्धतीचा ठराव मी ह्या ठिकाणी मांडत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, आपण सर्वांनी चर्चा केलेली आहे. आणि माजी सभापती आपणच तो ठराव आपल्या काळामध्ये केलेला आहे. एक आदमी को आपने प्रोग्रॅम करनेके लिए मैदान दे दिया उसमे अटीशर्ती मे आपने लिखा है, ध्वनिप्रेक्षित आवाज मर्यादित असावा जेणेकरुन शाळेच्या विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही. ह्याची दक्षता घेण्यात यावी. और अगर वो उल्लंघन करता है, तो उसके उपर आप फाईन करो अन्यथा उसके उपर केस करो। और दुसरी अटी शर्ती मे मैदान साफ नही करता है। तो प्रशासन मैदान साफ करके उसके उपर दंड लगा सकता। अगर आपने उसका २५०/- आप लिया है। हमने उसके पास ज्यादा पैसा लिआ है। अगर वह साफसफाई पैसा नही लिया है। अगर वह साफसफाई नही करता है। तो आप अपना साफसफाई का २५०/-, ३००/- लगता है तो आप उनसे २०००/- लो ना क्योंकि आपने साफ-सफाई नही की।

**मोहन पाटील :-**

धनराजजी आपण जे खाजगी लिहिले आहे व जे झाडणार आहोत. त्याचापण उल्लेख आपण करुन दयावा आणि खाजगी संस्थाना द्यायचेच नाही आहे. खाजगी संस्थांना दिले तर पुन्हा तोच प्रबंध होईल.

**धनराज अग्रवाल :-**

शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संस्थांना द्यायचे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

राज्य शासनाचा जी.आर. अगदी स्वयं स्पष्ट आहे. आता मुंबई महानगरपालिकेचे शिवाजी पार्कचे मैदान भाड्याने देण्याबाबत हायकोर्टात, सुप्रीम कोर्टात रिपीटेशन दाखल झाले होते. त्यामध्ये शासनाने जी.आर. काढलेला आहे. तो जी.आर. अगदी स्वयंस्पष्ट आहे. महाराष्ट्र शासनाचा ३० सप्टेंबर, १९९७ चा जी.आर. आहे. त्यातले मी शासनाने निर्देश करुन दाखवितो.

**मा. सभापती :-**

ह्याच्यापुढे प्रशासनाने ध्यान देऊन कोणालाही मैदान देऊ नये.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब आपण हे पूढे करणार नाही. आपण ह्याला दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

ह्याच्यापुढे होणार नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

क्रिडांगण धार्मिक, राष्ट्रीय समारंभासाठीच अनुज्ञेय करताना खालील अटीशर्तीचे पालन करण्यांत यावे. क्रिडांगणाचा वापर वाणिज्य वापरासाठी अनुज्ञेय राहणार नाही. ही अट शासनाने टाकलेली आहे. दुसरी अट टाकलेली आहे. कलम ३७ (अ) मध्ये, धार्मिक संस्थेचे व धार्मिक समारंभास त्यावर करण्यांत आलेल्या खर्चाची पुर्तता ''ना नफा ना तोटा'' ह्या तत्त्वावर प्रवेश फी किंवा देणगी जमा करण्यांस अनुमती देण्यांत येईल. या अनुषंगाने नियम व नियमावलीचे आदेश, न्यायालयाचे आदेश ह्याबाबत मुंबई पोलिस अधिनियमांन्वये जारी केलेल्या आदेशाचा समावेश आहे व त्याचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. त्याच्यात लाऊड स्पीकरचा वापर साडेअकरा नंतर अनुज्ञेय होणार नाही. ह्याच्यात स्पष्ट म्हटले आहे की क्रिडांगणाचा वापर करता येणार नाही.

**अशोक पाटील :-**

आतापर्यंत उपआयुक्त साहेबांनी आपल्याला ठराव दोन वेळा वाचून दाखविले. मुंबई महानगरपालिकेचा जी.आर. देखील वाचुन दाखविला आता मागच्या सभागृहाने त्यांना सविस्तर ठराव दिलेला आहे. विषयपत्रिकेवर विषय आणून त्या ठरावाच्या अनुसराने प्रशासनाने त्या संबंधित संस्थेला परवानगी दिलेली आहे. आणि परवानगी देताना तुम्ही ह्या सर्व बाबींचा नक्की विचार केलेला असेल. आता जे नियम तुम्ही आम्हाला वाचून दाखविले, मुंबई महानगरपालिकेचे जी.आर. देखील तर हे सर्व

तुम्ही संपूर्ण विचाराधीन घेऊनच त्या संबंधी संस्थेला परवानगी दिली असेल आणि त्याचे पैसे देखील तुम्ही स्विकारले आणि आता त्यांना परवानगी नाकारण्यासाठी तुम्ही आमच्याकडुन दुसरा ठराव घेऊ इच्छिता का? मग तशी सविस्तर टिपणी आपण सभागृहासमोर आणायला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, ह्या ठिकाणी हा जो विषय आलेला आहे आणि ही आपली स्थानिक स्वराज्य संस्था आहे आणि ह्या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नागरिकांना कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करुन द्यायचे आहे ते त्याचे अधिनियम आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम १९५९ अन्वये आणि ह्या अधिनियमान्वये आपल्याला आपली उपविधी तयार करावयाची असते. तर उपविधी ही त्या अधिनियमाला पूरक अशीच करावी लागते. अधिनियम एका बाजुला उपविधी दुसऱ्या बाजुला होऊ शकत नाही. कारण उपविधी तयार करताना आपल्याला त्या अधिनियमात जी पुरक अशी उपविधी आहेत का नाही हे लक्षात घेऊनच आपण ती उपविधी तयार करत असतो आणि ह्याठिकाणी आपला जो विषय आलेला आहे. आणि तुम्ही आता ज्या परिपत्रकाचे वाचन केलेले आहे. आपल्याला त्या परिपत्रकाप्रमाणे चालायचे आहे किंवा आपण जो ठराव केला आहे. त्याप्रमाणे चालायचे आहे. शेवटी आपल्याला निर्णय घ्यायचा आहे. एकदा आपण ठराव केल्यानंतर तो सर्वांना बंधनकारक आहे. मी मागे देखील आपल्याला सांगितले, पाणी पुरवठ्याचा संदर्भात ठराव झाला. स्थायी समितीने तो मंजुर केला आणि मंजुर झाल्यानंतर प्रत्येक अधिकाऱ्याला ते कम्पलसरी बंधनकारक आहे. त्याप्रमाणे त्याने पुढची कार्यवाही केली पाहिजे आणि हा विषय सभागृहापुढे यायला नाही पाहिजे होता. दिनेशजी नलावडेजींनी येथे चांगली भूमिकी मांडली. खरंतर त्यांना येथे धन्यवाद दिले पाहिजे. प्रशासनाला जी भूमिका मांडायला पाहिजे होती ती भूमिका त्यांनी मांडलेली आहे. कारण त्यांनी सांगितले की माझ्याकडे कोकणप्रेमी जनता आली आणि त्यांना फोन आला. त्यांनी सांगितले आहे की, त्या ठरावावर माझी सही आहे ठराव केलला आहे. त्या ठरावाप्रमाणे योग्य ती कार्यवाही होईल. असे उत्तर आम्हाला प्रशासनाकडुन अपेक्षित होते. पण प्रशासनाकडुन तसे उत्तर मिळाले नाही. प्रशासनाने उत्तर दयायला पाहिजे ठराव झालेला आहे आम्हाला ते बंधनकारक आहे. अशी प्रशासनाची खंबीर भूमिका पाहिजे. तुम्ही बावरता का, काय राजकारण चालले आहे. मला कळतच नाही. आम्ही सर्व तुमच्या पाठीशी आहोत एकदा ठराव करुन दिल्यानंतर त्या ठरावात दुरुस्ती करायची असेल तर तुम्ही रितसर हा प्रस्ताव येथे घेऊन या , की आम्हाला व्यावसायिक रित्या जागेचा वापर करत असेल तर त्यांना व्यावसायिक कर लावा आणि सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था ह्यांना कमी दरात लावा. असा संपूर्ण रितसर प्रस्ताव ह्या सभागृहात आणावा आणि ह्या विषयाला जर कोणी वेगळा ठराव मांडत असेल तर तो कायदेशीर ठरणार नाही.

**मा. सभापती :-**

आसिफ शेखजी आपण हा विषय स्थायी समितीत आणलेला आहे आपल्याला मैदान द्यायचे आहे किंवा नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सभापती महोदय आपण ह्यांना परवानगी दिलेली आहे. आणि दयायचे किंवा नाही हा प्रश्न नाही आहे. व प्रशासनाने ह्याच्यावर कोणताही विचार न करता हा विषय पुन्हा आपल्याकडे आणला आणि त्या विषयावर चर्चा व्हावी असे आपण निर्णय घेतलेला आहे आणि त्या निर्णयामध्ये आपल्याला काही ॲग्जेस्टमेंट करायचे असेल काही बदल करायचे असेल त्यासाठी प्रस्ताव आणलेला आहे व त्याच्यावर चर्चा करुन घ्या असे आहे.

**नितीन ठाकुर :-**

आपण दिलेली परवानगी ही चुकीची आहे का बरोबर आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.):-**

बरोबर आहे.

**नितीन ठाकुर :-**

दिलेली परवानगी बरोबर आहे. तर मग आपण हा विषय येथे कशाला आणला?

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, आपण ही जी परवानगी दिली ती अधिकृत आहे कारण आपला स्थायी समितीचा ठराव होता. मी आधी आपल्याला सांगितले की, सन्मा. नगरसेविका तिथे राहतात. त्यांनी ऑब्जेक्शन घेतलेले आहे. तर त्या अनुषंगाने आपण त्यांना सूचना कराव्यात की आरोग्यविषयक आपण

काय काळजी घेतली पाहिजे, स्वच्छता कशी केली पाहिजे. ह्याची जबाबदारी त्यांना दिली पाहिजे. त्यांना लाऊड स्पीकरवर आपण रेस्टीक्शन घातले पाहिजे. आणि भाडेवाढ किंवा इतर ज्या गोष्टी आहेत. उपआयुक्त साहेबांनी आपल्याला सांगितले की आपल्याला ते मैदान न देता येण्यासाठी काही करता येईल. परंतु असे करु नका कारण की त्या परिसरातील त्या गावातील सगळी लोक तिथे क्रिकेट किंवा सामाजिक कार्यक्रमासाठी त्या ग्राऊंडचा उपयोग करतात व तो झाला पाहिजे. याबाबत जर आपल्याला योग्य निर्णय घ्यायचा असेल तर हा विषय स्थायी समिती समोर आणून त्याच्यावरती भाडे वाढ करणे किंवा नियमावली तयार करणे ते केले पाहिजे. परंतु आता आपण जी परवानगी दिली आहे. त्याला ते बंधनकारक बंधन घाला की त्याने काय काय काळजी घेतली पाहिजे. आणि त्याप्रमाणे परवानगी दया. ह्याच्यापूढे असे कार्यक्रम करता येणार नाही त्याबाबत आपण धोरण ठरवू.

**मोहन पाटील :-**

साहेब, आपल्याला जो प्रस्ताव मी दिलेला आहे त्याप्रमाणे आपण रिफन्डेबल करुन घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

आवश्यकता वाटल्यास आपण परत चर्चा करु या. एकदा पुन्हा अधिकृत हा विषय आणा. आणि मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील जेवढी मैदाने भाड्याने घेतली जात असतात किंवा ह्याच्यापुढे कुठल्या कुठल्या मैदानांचा वापर केला जाईल. ह्या गोष्टी आपल्या नजरेसमोर ठेवुन आपण एक विशेष नियमावली तयार करावी आणि भाडे निश्चित करावे.

**रिटा शाह :-**

साहेब, ऑलरेडी ठराव झालेला आहे. मला वाटते ठरावामध्ये बदल करायचा अधिकार आपल्याला नाही. आपण द्यायचे नाही द्यायचे प्रश्न नाही. फक्त अटी शर्तीला तुम्ही जागे राहून कोणालाही दया. पण जसे ठरावामध्ये आहे तसे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

ठरावामध्ये फेरबदल करायचा अधिकार समितीचा आहे.

**रिटा शाह :-**

मग तसा विषय यायला पाहिजे.

**अशोक पाटील :-**

पुढच्या सभेत तसा तुम्ही सविस्तर विषय आणा.

**दिपक खांबीत :-**

आपण पाच दिवसाची परवानगी दया.

**मोहन पाटील :-**

ठिक आहे पाच दिवसाकरीता परवानगी दया.

**अशोक पाटील :-**

त्यांनी परवानगी दिलेली आहे. त्यांनी पैसे भरलेले आहे उदया ते कोर्टात जातील त्याला जिम्मेदार कोण?

**नितीन ठाकुर :-**

साहेब, आपण जी फी घेतली आहे. ती किती दिवसांकरीता घेतली आहे.

**मा. सभापती :-**

तीस दिवसांकरीता. त्यावेळेला प्रशासनाला लक्षात आले नाही आणि त्यांनी फी घेतलेली आहे. परंतु त्यांना शाळा केव्हा सुरु होईल हे माहिती नाही. शाळा दहा तारखेपासुन सुरु होते आणि त्या लोकांनी तेवीस तारखेपर्यंत परमीशन मागितलेली आहे. आणि ती परमिशन आपण देऊ शकत नाही. तरी आपण त्यांना पाच दिवसाकरिता मैदान देऊ शकतो.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब हे प्रशासनाचे अधिकार आहेत. त्यांनी त्यांची चुक सुधारुन घ्यावी.

**मा. सभापती :-**

चुक झालेली आहे. फी आली म्हणुन त्यांनी तारीख दिलेली आहे. दहा तारखेलर शाळा सुरु होते आणि दहा तारखेच्या नंतर आपण त्यांना परमीशन देऊच शकत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेब, मोहन पाटील साहेबांनी जी सुचना येथे आणलेली आहे. जुन्या ज्या परवानग्या दिलेल्या आहेत त्या तांत्रिक दृष्ट्या ज्या परवानगी तुम्ही देऊ शकत नाही ते त्यांनी दिलेल्या आहेत. जुन्या ज्या परवानग्या आहेत ते रद्द करा आणि घेतलेले पैसे परत करा आणि पाच दिवस तीन हजार रुपये या भाडेतत्वावरती दयावा.

**अशोक पाटील :-**

तसे नियमात बसते का? दिलेली परवानगी रद्द करता येते का?

**हॅरल बोर्जीस :-**

माझे सुद्धा नियमात न बसताना मागच्या स्थायी समितीनच्या गव्हर्नर बॉडीने ठराव केलेला आहे.

**दिपक खांबीत :-**

शाळा सुरु होईपर्यंत परमीशन देण्यात यावी.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

या प्रकरणामध्ये मी सभागृहाची माफी मागू इच्छितो. आपल्या प्रशासनाने शाळा किती तारखेला सुरु होते. त्याची माहिती अगोदर घेतलेली नाही. ठरावामध्ये असा उल्लेख आहे, की शाळा चालू असताना आपण परवानगी देऊ शकत नाही. शाळा सुरु होण्याच्या दिवसाची माहिती ह्यांना नव्हती. किंवा माहिती संबंधित शिक्षण विभागाकडुन घेतलेली नाही. आणि शाळा ज्या तारखेपासुन सुरु होते त्या दिवसापर्यंत आपण परवानगी दयावी.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, ही प्रशासनाची बाब आहे. ते आपण बघा. आपण आमच्याकडुन परवानगी का मागता.

**मोहन पाटील :-**

प्रशासनाने माफी मागितलेली आहे. त्या विषयाचा ठराव न करता प्रशासनाने तो विषय आवरुन घ्यावा. आम्ही जो प्रस्ताव ह्याच्यावर मांडला आहे तो प्रस्ताव इतिवृत्तांतातुन काढुन टाका.

**आसिफ शेख :-**

प्रशासनाने ह्याबाबत आपल्या अखत्यारीमध्ये निर्णय दयावा.

**प्रकरण क्र. १४८ :-**

नवघर शाळा मैदान मालवणी जत्रोत्सवासाठी भाड्याने देण्याची परवानगी रद्द करणेबाबत मा. सौ. प्रभात पाटील, नगरसेविका यांच्या पत्रावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It Baa[-Mdr ³pUva-´ navaGar yaoqao SaaLocao maOdana SaOxaiNak va saamaaijak saMsqaanaaca tsaoca sau+Icyaa idvasaat KajagaI saMsqaa va naagarIk yaaMnaa BaaDyaanao doNaobaabat maa. sqaayaI saimatI saBaa id.23.01.2003 zrava Ë.110 Anvayao zrava parIt Jaalaolaa AsaUna sadr maOdana maalavaNaI ja~ao%savaakrIta mao. kaokNa p`omaI ima~ maMDL yaaMnaa id.04.11.2003 to id.23.11.2003 pya-t BaaDyaanao vaaprNyaasa prvaanagaI doNyaat AalaolaI Aaho. sadr kamaI mao.kaokNap`omaI ima~ maMDL yaaMnaI mahanagarpailakokDo BaaDyaapaoTI $.5020À¹ r@kma jamaa kolaolaI Aahot.

sadr prvaanagaI baabat maa.saaO p`Baat paTIla¸ nagarsaoivaka yaaMnaI id.29.09.2003 raojaI p~ do}na sadr maOdana gaolyaa vaYaI- maalavaNaI ja~ao%savaakrIta BaaDyaanao idlyaamauLo Aaraogya ivaYayak inamaa-Na Jaalaolyaa tËarIcao sva$p namaUd kolaolao Aaho. saaobat %yaaMcyaa p~vyavahar jaaoDlaolaa Aaho. sadr maalavaNaI ja~ao%savaasa prvaanagaI do}na maa.EaI. raohIdasa paTIla¸

maa.EaI. saMjaya paMgao¸ maa.EaI. Sard koSava paTIla va maa.EaI. iSavap`saad Baudoka yaa nagarsaovakaMnaI sahkaya-krNyaabaabat p~  idlaolao Aahot.

]prao@t sava- nagarsaovakaMcyaa p~aMcaa ivacaar krta p`Saasanaanao sadr navaGar SaaLa idvaaLIcyaa sau+I naMtr kovha sau$ haoNaar Aaho¸ ho tpasaUna Gao}naca zrava Ë.110 id. 23.01.2003 naUsaar puZIla yaaogya tI kaya-vaahI kravaI.

**सुचक :- श्री.** **अनुमोदन :- श्री.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४९ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

वसुली कमी आहे. आपण वसुली बरोबर करुन घ्यावी.

**मा. सभापती :-**

तो जो संगणक ठेकेदार आहे. तो बिल काढत नाही म्हणुन वसुली होत नाही. त्याच्यावर पोलीस कारवाई आजच्या आज करावी असा माझा आदेश आहे.

**मोहन पाटील :-**

आपण त्या ठेकेदाराला एकदा बोलावुन घ्या आणि जर तो आला नाही तर मग आपण कारवाई करा.

**प्रकरण क्र. १४९ :-**

मा. स्थायी समिती सभा दिनांक ९/१०/०३ चे तहकुब प्रकरण क्र. १४६ माहे एप्रिल २००३ ते जुन २००३ अखेरच्या त्रैमासिक जमा खर्चास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माहे एप्रिल २००३ ते जून २००३ अखेरचे त्रेमासिक जमाखर्चाचे लेखे एम.ए.सी. १९७१ फॉर्म नं. २६ नुसार तयार करुन मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील तपासणी करुन घेण्यांत आलेल्या लेख्यांस आजची सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हरेश गावंड.** **अनुमोदन :- श्री. अशोक पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५० चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपल्या चाळीस लाखाची तरतुद आहे आणि येथे ६१ लाखाचे दिले आहे. आपण जरा तपासुन घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

आपल्याला दिलेल्या पत्रकामध्ये ४ आणि ५ हा डबल कॉलम आला आहे. एकच कॉलम रिपीट झाला आहे. त्याच्यामध्ये सुधारित आपल्याला एक प्रत दिलेली आहे. त्याच्यामध्ये तारीख नाही आहे.

**शरद पाटील :-**

म्हणजे एकूण दहा आयटम झाले.

**डॉ. बावस्कर :-**

एकूण बारा आयटम आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, ह्याच्यात आपल्याला खरेदी कामी चाळीस लाख रुपये आपल्याकडे शिल्लक आहे. हा टेंडर कितीचा आहे.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, चाळीस लाख रुपये आपल्याकडे शिल्लक आहेत आणि टेंडरची एकूण अंदाजित क्वॉंटीटी ह्याठिकाणी दिलेली आहे आणि सदतीस लाख रुपये बाकी आहे.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, ह्याची किंमत ६१ लाख रुपये होते.

**डॉ. बावस्कर :-**

त्याची किंमत जरी ६१ लाख रुपये आलेली असली तरी बजेटच्या बाहेर आपण कधीही जात नाही आणि आपण निविदा मागविताना जो अंदाज ठरविण्यांत आला होता. त्या अंदाजानुसार ही किंमत ६० रुपये आपण डिपॉझिट ठेवले होते. परंतु त्याच्या नंतर महाराष्ट्र शासनाकडुन जे महाराष्ट्र शासनावे हिवताप निर्मूलन आणि हत्तीरोग नियंत्रण विभाग आहे. ह्या विभागाकडे जे जॉईंट डायरेक्टर आहेत त्यांची आणि माझी वैयक्तीक मैत्री असल्या कारणामुळे त्यांच्याकडे जाऊन आपल्याकडे तातडीने जवळ जवळ साडेतीन चार लाखांची किटकनाशके वैयक्तिकरित्या जाऊन त्यांच्या ऑफीसमधुन घेऊन आलेलो आहे व आपल्याला कॉन्टीटीही कमी होईल आणि आवश्यकतेनुसार आपले जेवढे बजेट उपलब्ध आहे. त्यानुसार बजेटच्या आतच आपण खरेदी करणार आहोत. बजेटच्या बाहेर कधीही खरेदी केली जाणार नाही.

**धनराज अग्रवाल :-**

म्हणजे प्रत्येक वस्तु आपण थोडी थोडी कमी करणार आहोत.

**डॉ. बावस्कर :-**

होय.

**मोहन पाटील :-**

त्याचा तपशिल पूर्ण घ्या.

**डॉ. बावस्कर :-**

ठरावामध्ये तसाच त्याचा उल्लेख राहिल की बजेटमध्ये जी तरतुद आहे त्याच्यापलिकडे जाणार नाही. ठराव अगदी सुस्पष्ट राहिल. कारण शासनाकडुन आपण जी वैयक्तिक पातळीवर मदत मागितली ती त्यांनी दिली. त्यामुळे आता कॉनटिटी कमी होईल आणि ही कॉन्टीटी कमी झाल्यामुळे जवळ जवळ आपल्याला सदतीस ते साडे सदतीस लाखापर्यंतचे ह्यावर्षी आवश्यकता भासेल. त्यापेक्षा जास्त आवश्यकता भासणार नाही. या प्रत्येक आयटमचे त्याच्या रिक्वायरमेंट नुसार कॉंन्टीटी ठरवून ती एकुण सदतीस ते साडे सदतीस लाखापेक्षा पूढे जाणार नाही. असा मी ठराव मा. स्थायी समिती समोर मांडत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मागे आपण जो विषय आणला होता. त्यावेळी आपण ठरविले होते की, एका ठिकाणी जर आपण औषध फवारले तर ते मच्छर दुस-या ठिकाणी पळुन जातात. एका दिवसात एका प्रभागामध्ये औषध फवारण्यांचे ठरले होते. पण तसे माझ्या प्रभागात झाले नाही. बायर इंडियाच्या येथे कोणीतरी टेकनिकल माणूस आला होता. त्याने सांगितले मी येथे करुन दाखवितो आणि आपण जे पहिले औषध आणले त्याचा परिणाम पहिले थोडे दिवस चांगला होता. नंतर ते औषध फवारायचे बरोबर होत नाही म्हणुन मच्छर येथे वाढलेले आहे. मागचे औषध शिल्लक आहे का? तुम्ही लोक सांगतात मागचे औषध शिल्लक नाही.

**डॉ. बावस्कर :-**

औषध आता शिल्लक नाही. आज मा. स्थायी समितीमध्ये मंजुरी मिळाल्यानंतर मी ह्या निविदा काराला सांगुन ठेवले आहे की मला दोन दिवसामध्ये ही औषधे पाहिजे आणि आपल्या सुचनेप्रमाणे टीम

तयार केलेले आहे की एका एका प्रभागामध्ये जाणार आहोत. स्पेशल टीम त्यांचे पंप, त्यांच्या गाड्या ह्याची संपूर्ण तयारी आपण ठेवलेली आहे. आणि आपण जी सूचना केलेली आहे त्याची पूर्ण अंमलबजावणी केली जाईल.

**धनराज अग्रवाल :-**

आयटम नंबर १० बघा. तुम्ही त्याला ऑर्डर दिली आहे २९.६६ प्रति लीटर ह्याच्यात सर्वात कमी भाव आहे २७० रू.

**डॉ. बावस्कर :-**

आपण कमी दरानेच घेणार आहोत. आपण २७० ने घेऊ.

**धनराज अग्रवाल :-**

आपल्या टिपणीमध्ये आपण २५१ ला पास केलेले आहे आणि २७० वाला कमी आहे.

**डॉ. बावस्कर :-**

डॉलफिन करुन खरेदी करणार आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

हे जे दिले आहे ते चुकीचे आहे ना.

**डॉ. बावस्कर :-**

जेवढे ही लोअेस्ट आहे. तेच घेणार आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

आयटम क्र. ३ ह्याच्यामध्ये दोन कंपन्यांनी भाव अंदाजे चौदाशे एवढा दिलेला आहे आणि दोन कंपन्यांनी सहाशे दिलेला आहे. एवढी मोठी तफावत कशी काय आली. क्वॉलिटिमध्ये फरक आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

क्वॉलिटि आपली ठरलेली आहे. ह्याच्यामध्ये आपण टेक्निकल नावानेच मागितले आहे ५० इ.सी.एम.एल.सी. फाइल्ड कौन्सलट्रेड टेमीफस्ट ५० % आपण घेणार आहोत. त्या कंपनीला मी विचारल्यानंतर त्यांनी सांगितले.

**धनराज अग्रवाल :-**

चार कंपनी दिल्या आहेत. त्या चारही कंपनी नामांकित कंपनी आहे. मग ह्या लोकांनी एवढा भाव का दिला आहे.

**डॉ. बावस्कर :-**

ह्या दोन कंपन्यांमध्ये त्यांना एक्साईज ड्युटी माफ आहे. दोन ठिकाणच्या मॅन्युफॅक्चरींग युनिट मध्ये आणि बाकीच्यांना एक्साईस ड्युटी जास्त पडते म्हणुन मोठ्या प्रमाणात त्याची किंमत दिली आहे. पण आपण सर्वांत कमी दराचीच निविदा ६३७ या ठिकाणी स्विकारण्यासाठी शिफारस केलेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

जर एक्साईस ड्युटी माफ असेल तर दुसऱ्या ह्याच्यात त्यांनी कुठे कमी काहीच केलेले नाही. त्याचा त्यांनी भाव बरोबर लावलेला आहे.

**डॉ. बावस्कर :-**

अग्रवाल साहेब ह्यांचे वेगवेगळे मॅन्युफॅक्चरींग युनिट असतात. त्या त्या युनिटमध्ये आज येथे नोसिलचे प्रॉडक्ट नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये येतात तर त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात त्यांना एक्साईस ड्युटी लागते. परंतु ह्यातले काही प्रॉडक्ट अंकलेश्वर किंवा वापी ह्याठिकाणी तयार होतात किंवा सिल्वासा अशा ठिकाणी तयार होतात. त्याठिकाणी एक्साईस ड्युटीला सुट त्याठिकाणी दिलेली आहे. ह्यातल्या काही कंपन्या काही प्रॉडक्ट प्रत्येक युनीटमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी बनवतात. त्याच्यामुळे प्रॉडक्ट वाईजमध्ये वेरीअेशन येऊ शकते. परंतु आपण ज्या निर्माती कंपनी आहे त्यांच्या भावाशी तुलना केलेली असते. व ह्यांच्या सी.बाय. आपण चौकशी करुन घेतलेली असते.

**धनराज अग्रवाल :-**

क्वॉलिटी आपण बरोबर बघून घ्या.

**डॉ. बावस्कर :-**

क्वॉलिटीमध्ये आपण कुठेही कॉम्प्रोमाईज करणार नाही.

**शरद पाटील :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, आता आपण ह्यांच्यामध्ये जी टिपणी दिली आहे. ती ६१ लाखाची आहे आणि आपण बोललात की सदतीस साडे सदतीस लाखाचे आपण खरेदी करणार. त्याचे आपण आम्हाला नंतर वेरीफिकेशन देणार काय?

**डॉ. बावस्कर :-**

ठरावच तसा करणार आहे.

**शरद पाटील :-**

दुसरी गोष्ट पहिले तर मी तुम्हचे धन्यवाद करतो. मच्छर अगदी संपूर्णपणे साफ झाले होते आणि आता मच्छर एवढे वाढले आहे. मधल्या काळात आम्ही जेव्हा फवारणी करायला सांगायचो तेव्हा औषध उपलब्ध होत नव्हते. तर आपण त्या औषधाची त्यावेळेला तरतुद का केली नाही.

**डॉ. बावस्कर :-**

ही जी प्रक्रिया आहे. टेकनिकल बाबी ठरवणे त्याचे टेंडर मागवणे त्याला उशिर झाला. परंतु आता ह्याच्यापुढे एकदा आपले टेकनिकल बाबी ठरलेले आहे. ते संपूर्ण आपल्याकडे तयार आहे. व पुढच्या वेळेला आपल्याला तशी गरज पडणार नाही. आपण फक्त टेंडर कॉल केले की औषध आपल्याला उपलब्ध होईल. तीन महिन्याचा स्टॉक आपण ठेवणार आहोत. त्याच्यामुळे ह्याच्यापुढे असे कधीही समस्या निर्माण होणार नाही. हे पहिले टेंडर असल्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये ह्याचे वर्कआऊट करावे लागेल. सगळ्या कंपन्यांचे टेक्निकल डिटेल्स घ्यावे लागेल. जर गठ्ठा आपण बघितला तर मोठे डॉक्युमेंट तयार झालेला आहे आणि ह्यापुढे तसा प्रश्न निर्माण होणार नाही.

**शरद पाटील :-**

मधल्या काळात आपण घरोघरी फवारणी करण्यांचे प्रोव्हीजन केले होते. पण अशी परिस्थिती आहे की शरद पाटील नगरसेवक आहेत म्हणुन शरद पाटीलच्या घरी पहिले फवारणी केली जाते. त्याच्यानंतर ते अर्धा वॉर्ड पूर्ण करतात. ते सर्वांच्या घरी जात नाही. असे नाही व्हायला पाहिजे. कारण जर का आपल्याला स्टाफ कमी पडतोय तर आपण वार्डवाईज घ्या. प्रत्येक वार्डात एका दिवसात काम पूर्ण करुन टाका. त्याच्यानंतर दुस-या ठिकाणी करुन घ्या. माणसे कमी पडल्यामुळे औषध फवारणी होत नाही. त्यामुळे लोकांचे ऐकावे लागते. ते आमच्या घरी येत नाही. त्यांच्या घरी गेले. अशी परिस्थिती आहे. त्यामुळे नगरसेवकांना लोकांचे ऐकावे लागते. ह्याच्यामध्ये तुम्ही योग्य तो निर्णय घ्या आणि दुसरे आपले जे फॉगींग मशीन आहे. ती एक फॉगींग मशीन आपण एका प्रभागात पाठवितो. एका दिवसात त्या फॉगींग मशीनने तो प्रभाग पूर्ण होत नाही आणि जेव्हा तो अर्धा प्रभाग राहतो आणि तो फॉगींग मशीनवाला पूढे जातो. जंपींग करतो तेव्हा तिथले नागरिक येऊन सांगतात की आमच्या येथे तो आला नाही. त्यामुळे जर आपल्याला फॉगींग मशीन कमी पडत असेल तर आपण ती घ्यावी. ह्याला आमची हरकत नाही. आपण त्याच्याकरिता मंजूरी देऊ. आरोग्य चांगले राहावे ह्याच्यासाठी कुणाचे ही विरोध नाही. पण ते काम पूर्ण झाले पाहिजे. आणि सगळ्या ठिकाणचे मच्छर मेले पाहिजे.

**डॉ. बावस्कर :-**

ह्याच्याबाबत जो कार्यक्रम तयार करण्यांत आलेला आहे. तो मी सुरुवातीला सर्व सदस्यांना त्यांच्या माहितीकरिता पाठवितो की, प्रत्येक वार्डवाईज केव्हा केव्हा येणार आहे आणि किती वार्डामध्ये आपण सुरुवातीला करणांर आहोत. ह्या तीन टीम तयार केलेल्या आहेत. भाईंदर पश्चिम, भाईंदर पूर्व आणि मिरा रोड आणि काशीमिरा अशा चार टीम आहेत. ह्या चार टीमचा प्रोग्रॅम मी आपल्याला देतो. त्यामुळे आपल्याला त्याची माहिती मिळेल. आणि पूर्ण वार्ड झाल्याशिवाय त्या ठिकाणाहुन ती टीम जाणार नाही. एक एक वार्डवाईजचे काम आपण तयार केले आहे. पंप आपण उपलब्ध करुन घेतले आहे. फॉगींग मशीनचा आढावा घेतो आणि जर गरज पडली तर फॉगींग मशीनचा प्रस्ताव मी आपल्यासमोर ठेवेन.

**धनराज अग्रवाल :-**

चाळीस लाखाचे औषध आपण आणणार आहोत आणि आता ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर पंधरा पर्यंत संपणार आहे. मग आपण कसं काय ठेवणार आहे.

**डॉ. बावस्कर :-**

हा साठा आपल्याला जवळ जवळ एप्रिलपर्यंत पुरेल आणि तीन तीन महिन्यांची आपण ऑर्डर देतो.

**शरद पाटील :-**

कामगारांना आपण मिक्सींगची ऑर्डर बरोबर दयावी.

**डॉ. बावस्कर :-**

मधल्या काळात मी नसल्यामुळे गैरहजर असल्यामुळे हे टेंडर यायला उशिर झाला आहे. परंतु आल्यानंतर लगेच काम केले. कीटकनाशके आणि अळीनाशके ह्यांची औषध आणेन फवारणीचा कार्यक्रमाची आपल्याला माहिती देण्यांत येईल.

**शरद पाटील :-**

बावस्कर साहेब आता आपण जे उत्तर दिले. मी नसल्यामुळे उशीर झाला. तसे उत्तर परत आम्हाला नको आहे. तुम्ही नसलात तरी दुसरे आहेत त्यांना तुम्ही कल्पना दयायला पाहिजे. हे उत्तर बरोबर नाही. तुम्ही नसल्यामुळे झाले नाही. तर ते निकामी आहेत असे आम्हाला बोलायला लागेल.

**डॉ. बावस्कर :-**

निकामी कोणी नाही.

**शरद पाटील :-**

मग आपण असे कसे बोलता मी नसल्यामुळे काम झाले नाही.

**डॉ. बावस्कर :-**

पंधरा वीस दिवस उशीर झाला.

**शरद पाटील :-**

त्या पंधरा वीस दिवसात आपली वर्षभराची केलेली मेहनत बरबाद होते. ते एकदम बेकार काम आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सध्या तुमच्याकडे किती औषधे शिल्लक आहे.

**डॉ. बावस्कर :-**

आपल्याकडे सध्या दहा हजार लिटर एम.एल.ओ. शिल्लक आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

उत्तनच्या ऑफीसमध्ये अजिबात औषध नसते.

**डॉ. बावस्कर :-**

दहा हजार लीटर एम.एल.ओ. आपण इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनकडुन परवाच मागविले आहे. दोन दिवसापूर्वी आलेले आहे. आणि प्रत्येक ऑफिसमध्ये काल ते वितरीत करण्यांत आलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जे फवारणी मारतात. त्यांना तुम्ही प्रमाण काय घेता.

**डॉ. बावस्कर :-**

फवारणी सुरु करण्यांपुर्वी त्यांना पुन्हा एकदा प्रशिक्षण देण्यांत येईल आणि बाटलीवर लिहिलेले असते एका लिटरला पाच एम.एल. ला किंवा एका लिटरला दहा एम.एल. चे कौन्स्टननुसार असते.

**नितीन ठाकुर :-**

पाच एम.एल. म्हणजे किती थेंब आले.

**डॉ. बावस्कर :-**

पाच एम.एल. त्याचे मेजरच त्याच्या बरोबर असते. बाटलीचे जे झाकण असते. ते पाच एम.एल. चे असते तर काही बाटलीचे झाकण दहा एम.एल. चे असते. त्याच्यावर तसे इंस्ट्रक्शन असतात. पुन्हा एकदा ह्या सर्व कामगारांना आणि स्वच्छता निरीक्षकांना पुन्हा एकदा इंस्ट्रक्शन देऊन फवारणीचे काम सुरु करण्यांत येईल.

**नितीन ठाकुर :-**

साहेब आपण मागे टेंडर काढले प्रभाग क्र. ३ आणि ४ चे सफाईसाठी प्रभाग क्र. ३ आणि ४ चे सफाईसाठी प्रभाग ३ मध्ये नेहरु नगर, अण्णानगर, शास्त्रीनगर येथे झोपडपट्टी खूप आहे आणि प्रभाग क्र. ४ मध्ये ही झोपडपट्टी भरपुर आहे. तिथे त्या ठेकेदाराकडे एकुण किती कामगार आहेत. तिथे औषधाची आपण वाटणी कशी कराल.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, साफसफाई आणि फवारणी मलेरिया निर्मुलन आणि हिवताप नियंत्रण आणि साफसफाई ह्याचा आपण कुठेही संबंध ठेवलेला नाही. आपले जे महानगरपालिकेचे कामगार

आहेत. ह्या कामगारांना आपण ह्या कामासाठी काढलेले आहे. आणि आपलेच कामगार फवारणी करणार आहे. साफसफाई आणि हे नियंत्रण किंवा हा कार्यक्रम पुर्णपणे वेगळा आहे. साफसफाईवाल्यांकडे गटाराची साफसफाई आहे. आपल्या लोकांकडे ह्याची फवारणी डास, अळी, उत्पादन स्थळ शोधणे ती त्याच्यावर फवारणी करायचे, नष्ट करणे. प्रत्येक आठवड्याला ती पुन्हा तपासणी करणे. त्या ठिकाणी जर पुन्हा ब्रिडींग असेल किंवा उत्पत्ती थोडी फार असेल तर पुन्हा पुन्हा करणे. ह्यांना अशा प्रकारचे रजिस्टर करायला सांगितले. उत्पादन स्थळांचे रजिस्टर करायला सांगितले आणि त्या उत्पादन स्थळाला प्रत्येक आठवड्याला भेट देऊन त्या ठिकाणी ब्रिडींग आहे का नाही. ह्या सगळ्या गोष्टीचे त्यांना मी एक दिवस पूर्ण ट्रेनिंग दिलेले आहे आणि त्यांना पुन्हा ट्रेनिंग देण्याची आवश्यकता आहे.

**नितीन ठाकुर :-**

आमच्या प्रभागाचा क्र. ३ चा लेखी रिपोर्ट आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

आज साफसफाईचा विषय नाही. आज कीटकनाशके आणि अळीनाशकाचा विषय आहे.

**आसिफ शेख :-**

या ठिकाणी प्रभाग क्र.३ मध्ये साफसफाईचा आणि औषधे फवारणीचा संबंध नाही असे डॉ. साहेबांनी सांगितले. मला असे वाटते हे व्यक्तव्य अतिशय चुकीचे आहे असे आपल्याला बोलताच येणार नाही. साफसफाई केल्यानंतर फवारणी केली पाहिजे. तरचं तिकडे पुन्हा डास येणार नाही आणि दोघांना एकत्रितपणे मोहिम राबवायला सांगायला पाहिजे. ह्या ठिकाणी सूचना करतो की साफसफाई केल्यानंतर फवारणी करायला पाहिजे. आता तुम्ही सांगता ही मोहिम वेगळी होणार ती मोहिम वेगळी होणार असे वेगळे करुन चालणार नाही. आणि आमच्या प्रभागामध्ये कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिले नाही. एक कर्मचारी, दोन कर्मचारी फिरतात आणि संपूर्ण वॉर्ड पाहतात. हे चुकीचे आहे.

**नितीन ठाकुर :-**

साहेब, डॉक्टरांचे मत असे असेल औषधाची फवारणी केल्यावर साफसफाईची गरजच नाही. फवारणी केली की तिथे किटक होणारच नाही.

**डॉ. बावस्कर :-**

ह्या दोघांची सांगड आपण नक्कीच घालुया. माझ्या म्हणण्याचा अर्थ वेगळा होता, येथे फक्त डास नियंत्रणासाठी किंवा डासांच्या उत्पत्ती स्थळाविषयी मी बोलत होतो. सार्वजनिक साफसफाई आणि आजार किंवा आजाराचा फैलाव ह्याचा नक्कीच संबंध आहे. ह्या सगळ्या गोष्टीची सांगड आपण घालुया आणि प्रोग्रॅम तयार करताना काय प्रोग्रॅम तयार केला ह्याची मी आपल्या बरोबर चर्चा करेल आणि जर आपल्या प्रमाणाची जर समाधानी सूचना असतील तर आपण नक्कीच घेऊ.

**शरद पाटील :-**

डॉ. साहेब ह्याच्यात उंदराचे दिलेले आहे आणि उंदीर असे आहेत ज्यांच्या अंगावरचे केस निघालेले आहे आणि त्या उंदराचा रोग काय असेल ते तुम्हाला आमच्यापेक्षा जास्त माहिती आहे आणि आम्ही हे सांगितल्यावर आम्हाला असे उत्तर आरोग्य विभागाकडुन दिले जातात की उंदराची दवा (केक) आम्ही गावात टाकले तर मुले खातील म्हणून आम्ही टाकत नाही. असा जर विचार केला तर त्या उंदराचा कधीच नायनाट होणार नाही. त्याच्यावर तुम्ही खबरदारी घ्या आणि त्याच्यावर लक्ष देऊन तुम्ही पूर्णपणे उंदरांचा नायनाट झाला पाहिजे असे काम करा.

**डॉ. बावस्कर :-**

मी माझ्या दालनात कालच बैठक घेतली. त्यांना अगदी क्लीअर केले आहे. उंदरांचे शेवटचे दोन प्रकारचे औषध आहे. एक आहे झिंगफॉक्सफाईड आणि दुसरे आहे जे केक येतात ते केक मागवलेले आहे. कॉमेन्ट्रट्रॉल म्हणुन केक आहे. दोन औषधे मागवलेले आहे. त्यामुळे कुठेही प्रॉब्लेम येणार नाही. सगळ्या ठिकाणी आपण त्याची काळजी घेऊ.

**अशोक पाटील :-**

डॉ. साहेब आपण जी फवारणी विषयक माहिती दिली ती फक्त बिल्डिंग किंवा शहरीभागांमध्ये करता की झोपडपट्टी प्रभागामध्येही करता.

**डॉ. बावस्कर :-**

सर्व ग्रामीण भाग, झोपडपट्टी भाग सर्व विभागामध्ये करतो.

**अशोक पाटील :-**

तुमच्याकडे त्यांचा रिपोर्ट आहे. तुम्ही माहिती घ्या. आणि पुढच्या वेळेला सविस्तर माहिती दया. माझ्या मते झोपडपट्टी प्रभागामध्ये तुमचे कर्मचारी जात नाही.

**डॉ. बावस्कर :-**

सविस्तर माहिती घेऊन त्यानंतर आपणांस सांगतो.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, सन्मा. सदस्य शरदजी पाटील ह्यांनी सांगितले उंदरांबद्दल तर उंदराबरोबरच जी मोकाट जनावरे आहेत. जी मोकाट कुत्रे आहेत त्यांनी लोक त्रासलेली आहे. प्रत्येक प्रभागात सर्व नागरिकांची बोंबाबोंब आहे. आपण त्या कुत्र्यांबद्दल काहीतरी बंदोबस्त करा. याबाबत प्रशासन काय कार्यवाही करणार आहे का नाही. ठिक आहे, सुप्रीम कोर्टाचे निर्देश आहेत. मेनका गांधी श्वानप्रेमी आहेत. ते सगळ्या गोष्टी जरी बरोबर असल्या तरी नागरिकांना त्या त्रासापासुन कशा पद्धतीने मुक्त करता येईल. रस्त्यावरुन चालणे मुश्किल झालेले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेब, डॉ. बावस्कर साहेब आपण आरोग्य विषयक फवारणीसाठी औषधाची मागणी करतोय. संपूर्ण मुंबई परिसरामध्ये परवाची न्यूज होती. बोरवलीला भगवती हॉस्पीटलमध्ये तिथे सहा डेंग्युचे रुग्ण सापडले व ती साथ अगदी जोरदार आहे. ती साथ आपल्याकडे पसरु नये म्हणून काळजी घेतली पाहिजे. आता जे आपण निविदा काढल्या आहेत त्या ६१ लाखाच्या काढलेल्या नाही असे आपण सांगितले. मागील मा. महासभेमध्ये माजी नगराध्यक्ष प्रफुल्लजी पाटील ह्यांनी अधिकारांबाबत बराचसा उहापोह केला. ह्याच्यामध्ये ऑडीटर साहेबांनी देखील विचारले होते. तर आपण अशा निविदा काढू शकतो का? आपण काढू शकत नसाल तर सन्मा. कार्यालयीन उपायुक्त ह्यांच्या नावाने काढा. त्याबद्दल जर प्रश्न उपस्थित झाला तर पुन्हा प्रॉब्लेम होईल. पुन्हा आपली मुदत पाच महिन्याची होती. त्या विषयात मी महासभेतही वाच्यता केलेली आहे. तशा आशयाचे पत्रही दिलेले आहे. उदया आपल्याला मुदतीचे पाच महिने पूर्ण होताहेत आणि त्यात जर आपण अडचणीत आलो तर त्याची जबाबदारी कोणाची? कारण आपण सर्व निविदा आपल्या सह्यानिशी काढलेली आहे. आणि आसिफ शेख साहेब आपलाही प्रश्न आलेला आहे. गाय-गुरे हा प्रश्नदेखील आहे. त्यांच्याबद्दल बावस्कर साहेबांशी आणि सर्व हेड ऑफ द डिपार्टमेंट ह्यांच्याशी सभापती साहेबांनी सर्व विषयावर चर्चा केली होती आणि ह्या विषयावर आपल्याला त्याच्याबद्दल योग्य निर्णय स्थायी समितीसमोर आणायचा आहे. अधिकाऱ्यांकडुन अहवाल मागविण्यांत आलेले आहे. आणि ज्या दिवशी तो विषय येईल. त्या दिवशी आपण त्याच्यावर सखोल चर्चा करु.

**मोहन पाटील :-**

ह्या ठिकाणी लेखापरिक्षक बसलेले आहे. आपणा समोर हा जो विषय आलेला आहे. ६१ लाखाची आपली निविदा आहे. आणि आपल्या बजेटमध्ये ४० लाखाची तरतुद आहे.

**नाकाडी :-**

पर लिटर ज्या किंमती आहेत त्याला मंजूरी घेतलेली आहे. आणि त्यांचे जे टेरेटीपची परिमाण आहेत किती कॉन्टीटी घ्यायचे अंदाजित आहे. ते काय बजेटच्या बाहेर जाऊ दिली नाहीत.

**मोहन पाटील :-**

तसे नाही तो काय विषय होऊच शकत नाही. हा सभागृहापुढे विषय आलेला आहे. आपण विषय तसा आणूच शकत नाही. तुम्ही सांगाल की आम्ही एवढी मंजूरी मागतोय आणि आम्ही एवढा खर्च अधिन राहून करू तर तसे नाही ही निविदा आहे. आपण एखाद्या बजेटमध्ये काम प्रस्तावित केले असेल तर आम्ही मंजूर करू. हे स्पेसीफिकेशन तुम्ही जे दिलेले आहे. जे संपूर्ण परटीक्यूलेशन दिलेले आहे. ती निविदा तुम्ही परटीक्युलर निविदा हेडवाईज दिलेली आहे आणि तो तेवढया तुमच्या बजेटला आहे. तेवढेच आपण मंजूर करावे असे मला बोलायचे आहे. तुम्ही अधिन राहू सांगा नको. पुढच्या सभेत येताना इतिवृत्तांतामध्ये तुम्ही तो फिगर स्पेसीमन द्या. हे जे तुम्ही दहा हेड दिले आहे. त्या दहा हेडमध्ये तुमचे ६१ लाख रूपये होतात. तरी आम्ही चाळीस लाखामध्ये तुम्हचे एवढे एवढे हेड कमी करा सभागृहाच्या सदस्यावर ते आपल्यावर येईल असे होईल.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब जी तरतुद आपल्या अंदाजपत्रकात दिलेली आहे. ती सत्तर लाखाची दिलेली आहे आणि सत्तर लाखातून चाळीस लाख शिल्लक सांगितले म्हणजे किती खर्च म्हणजे तीस लाख रूपये आधीच खर्च झाले. आता आपण ज्या निविदा मागवल्या त्या ६१ लाखाच्या मागवलेल्या आहेत आणि आपल्याकडे मुळातच शिल्लक चाळीस लाख आहेत. जेवढे बजेट शिल्लक आहेत तेवढेच आपण मागवावे.

**अशोक पाटील :-**

नाकाडी साहेबांनी उत्तर दिले तरतुद चाळीस लाखाची आहे. आणि ६० लाखाची आपण आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी आपण आमच्याकडून घेत आहात. ऑडीटरच्या नियमामध्ये बसते का ?

**मा. सभापती :-**

त्यांनी आपल्याकडे मंजूरी आता सदतीस लाखाची मागितली आहे.

**आसिफ शेख :-**

साहेब, त्यांी टेंडर कॉल केलेले आहे. आपण टेंडरला मंजूरी देतो. समजा टेंडर आपण कॉल केले आम्ही ६१ लाखाला मंजूरी दिली आणि ठिक आहे. चाळीस लाख रूपये दोन महिन्यात संपूर्ण जाईल. स्थायी समितीने मंजूरी दिल्या नंतर तरतुद ४० लाख आहे. आणि जे उर्वरीत २० ते २१ लाख रूपये तुमच्याकडे आहे ते काय करणार तुम्ही पुढच्या अर्थसंकल्पास त्यांना अगोदरच देऊन टाकणार म्हणजे ही जी पद्धत चालली आहे. प्रशासनाची ही पद्धत ग्रामपंचायत होती, नगरपालिका होती तिथ पर्यंत ठिक आहे. आणि आता नगरपालिकेची महानगरपालिका झालेली आहे. आणि सर्व ठिकाणी आपण सक्षम अधिकाऱ्यांना कॅबिन दिल्या आहेत, गाडया, खुर्च्या दिल्या आहेत. तर कारभार त्याच पद्धतीने चालला पाहिजे. पुन्हा पुन्हा जर तीच बाब होत असेल तर मला वाटते ग्रामपंचायत बरी होती आहे. सरपंचांना केवढा अधिकार होता. नगरपालिका चागली होती नगराध्यक्षांना केवढा अधिकार होता. पण येथे काय चालले आहे. सर्व अधिकार आम्ही आपल्यावर सोपवूवन दिले आहेत तरी काय काम होतच नाही. एखादा प्रस्ताव आल्यानंतर तो कायदेशीर आहे किंवा नाही. व्यवस्थित बजेटमध्ये प्रोव्हीजन आहे का नाही आणि आपण व्यवस्थित काम करतो का? हे प्रशासनाने बघायला पाहिजे. जर उद्या काय झाले तर प्रशासन आपले हात वर करणार आणि ठाण्याप्रमाणे प्रकरणे व्हायचे. नंदलाल समिती येईल आणि सगळे लोक जाणार आणि त्यामध्ये नगरसेवकच गेलेले आहे. स्थायी समितीचे लोक गेलेले आहे आणि अधिकारी कोणीही गेलेले नाही. तर ह्या ठिकाणी सभापती साहेब आपण चांगला निर्णय दिला. त्या ठेकेदाराला पोलिस कोठडीत बंद करा. आपले अभिनंदन करतो. अशी सुरूवात आपण चांगली करा. मी सांगतो एक किंवा दोन लोक खरंच काम करत नसतील. प्रशासनाला अडचण आणत असेल. सदस्यांना अडचण आणत असेल. आपआपसात जर भांडणे लावण्याचा प्रयत्न अधिकारी वर्ग करत असतील तर अशा एक दोन लोकांना आपण घरी बसवा. आणि चांगले एक उदाहरण जाऊ दे की मॉरस शेट सभापती झाले त्यांनतर ह्या स्थायी समितीने एक चांगला निर्णय घेतलेला आहे. अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, प्रशासनाला चांगली शिस्त लागली आहे. साहेब हे दिसू द्या आमचे एवढेच म्हणणे आहे.

**मा. सभापती :-**

मी तुमच्या समोर आहे. तुम्हाला जर कोण आवडत नसेल तर तुम्ही आम्हाला सांगा. मी त्याला आताच्या आत्ता काढतो.

**असिफ शेख :-**

चुकीचा प्रस्ताव असे बोललो.

**मा. सभापती :-**

चुकीचा प्रस्ताव आहे. तुम्ही आम्हाला मान्यता द्या मी ताबडतोब कार्यवाही करतो.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांनी ठराव मांडलेला आहे की, दुरूस्ती करून सभेसमोर यावे त्याला मी अनुमोदन देत आहे.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, सदतीस साडे सदतीस लाख जो आपली रिक्वॉयरमेंट आहे. त्यानुसार कॉन्टीटी कॅल्क्यूलेट करून तसाच उल्लेख ठरावामध्ये येईल आणि आपली मंजूरी घेताना शेवटचा शब्द एवढया लाखास मा. स्थायी समिती मंजूरी देत आहे. एवढेच येईल. ह्यांच्या पलीकडे आपली मंजूरी

राहणार नाही. हा अंदाजित क्वांन्टीटी असते. टेंडर मागवताना प्रत्येक वेळेला अंदाजित असते. आणि टेंडरमध्ये अटीशर्ती आहे की ही अंदाजित क्वांन्टीटी दिलेली आहे. यामध्ये फेरबदल होऊ शकतो. आणि फेरबदल करण्याचे अधिकार मा. महानगरपालिकेने राखुन ठेवलेले आहे. प्रत्येक ठिकाणी ह्याचा क्लॉज आहे. प्रत्येक ठिकाणी आपल्याला बदल करता येतो. हा गोषवारा दिलेला आहे. हा फक्त अंदाज आहे. ह्या दराला मंजूरी दिल्यानंतर ह्यांची क्वांन्टीटी बसेल तेवढी क्वान्टीटी कॅल्क्यूलेट करून त्यावरच सही घेणार आहोत.

**मोहन पाटील :-**

त्याची रक्क्म नाकाडी साो. आपण फिक्स करा असे आम्हाला बोलायचे आहे.

**याकुब कुरेशी :-**

डॉक्टर साहेब आता तुम्ही बोलतात की हा गोषवारा आहे. पण हा नक्की गोषवारा आहे का ठराव आहे.

**डॉ. बावस्कर :-**

गोषवारा आहे.

**शरद पाटील :-**

हा गोषवारा आहे ते बरोबर आहे. गोषवारामध्ये फार मोठी तफावत वाटते. तुम्ही आता साडे सदतीस लाख बोलता ह्याला मंजूरी देण्यासाठी कुणाचा विरोध नाही. पण ह्यांच्यामध्ये एवढी मोठी तफावत आहे. आज साडे सदतीस लाख तुम्ही तयार केली तरी त्याच्यात किती रक्कमेचा फरक पडला पाहिजे ह्याचे भान आपण ठेवायला पाहिजे. आणि दुसरी गोष्ट ह्याच्यात जी चुक झालेली आहे. त्या चुकीत देखील टोटल मिस्टेक आहे. आता ६१ वरून सरळ टोटल आला आहे ४६ लाख ६५० रू. म्हणजे एवढी तुम्हची अंदाजित रक्कम झाली आणि हीच जर रक्कम पहिल्या गोषवाऱ्यात असती तर एवढे बोलायची गरज लागली नसती. गोषवारा तपासून बघत नाही. आणि ते तपासून जेव्हा तुम्ही आम्हाला वेळेवर देता तिच प्रत जर आम्हाला एक दिवस अगोदर आली असती तर गोंधळ व्हायचा प्रश्न येतच नव्हता.

**डॉ. बावस्कर :-**

आपण फक्त दराला मंजूरी घेणार आहोत आणि जेवढी तरतूद आहे.

**शरद पाटील :-**

जी रक्कम तुम्ही फिक्स कराल. तेवढ्याचीच तुम्ही मंजूरी घ्या. तसे असेल तरच स्थायी समिती तुम्हाला मंजूरी देईल अन्यथा देण्याचा प्रश्न येत नाही.

**डॉ. बावस्कर :-**

जेवढी गरज आहे. तेवढीच मंजूरी आम्ही मागतोय.

**रिटा शहा :-**

साहेब गोषवारा देता त्याच्यावर आपण तारीख टाकावी.

**प्रकरण क्र. १५० :-**

डास नियंत्रणासाठी आवश्यक असणारी अळी नाशके, किटकनाशके तसेच उंदीर नाशके खरेदी करण्यासाठी आलेल्या निविदांनी मंजूरी मिळणे बाबत.

**ठराव क्र. :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणत सखल भागात पाणी साठते महापालिका क्षेत्रात एनोफीलीस, क्युलेक्स या जातीचे डास आढळतात या शिवाय काही ठिकाणी डेंग्यु डास पसरवणारा ऐडीज इजिप्तीन या डासाची उत्पती स्थाने आढळली आहे. डासांची उत्पती स्थाने शोधणे व ती नष्ट करणे डासांवर नियंत्रण करण्यासाठी घरोघरी किटकनाशकांची फवारणी करणे डास उत्पती स्थानावर डास अळीनाशकाची फवारणी करणे कामी आवश्यक किटक नाशक, उंदीर नाशक, पुरवठा करणे कामी निविदा वृत्त पत्रात जाहिरात प्रसिध्द करून निविदा मागवण्यात आल्या होत्या.

डास नाशके, किटक नाशके, अळी नाशके इ. गुणवत्ता चांगली असावी व नामांकीत उत्पादक कंपनीची किटक नाशके, अळी नाशके उपलब व्हावी यासाठी निविदेत प्रत्येक बाबीसाठी सविस्तर तांत्रीक तपशिल नमुद केला होता. निविदा प्रक्रियेत खालील निविदाकारांनी निविदा अर्ज विकत घेतले होते.

१) घरडा केमिकल्स

६) मे आशिष डायकेम कॉर्पोरेशन

| | |
|---|---|
| २) रमेश ॲग्रोकेम | ७) मे राज ॲग्रोकेर प्रा. लि. |
| ३) डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | ८) मे डॅपमॅन्स पेस्ट कंट्रोल |
| ४) श्रीराम ॲग्रो एजन्सी | ९) मे डहाणू ॲग्रो ट्रेडींग कॉर्पोरेशन |
| ५) मे गोदरेज साराली | १०) साईश्रध्दा ट्रेडर्स |

वरील पैकी विहित मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा खालीलप्रमाणे

१) घरडा केमिकल्स
२) रमेश ॲग्रोकेम कॉर्पोरेशन
३) डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन
४) श्रीराम ॲग्रो एजन्सी

प्राप्त निविदांचा प्रत्येक बाबीनुसार तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **किटक नाशके अळी नाशके उंदीर नाशके** | **आवश्यक अंदाजीत परिमाण** | **घरडा केमिकल्स** | **रमेश ॲग्रोकेम कॉर्पोरेशन** | **डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन** | **श्रीराम ॲग्रो एजन्सी** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फेन्थिऑन ८२.५ % इ.सी | ४०० लिटर | निरंक | रु. १६०५.०० प्रति लिटर | रू. १६५३.०० प्रति लिटर | रु. १७१०.०० प्रति लिटर |
| २ | फेन्थिऑन २ % ग्रॅन्युअल | २५ किलो | निरंक | रू. १७२.०० प्रति किलो | रू. १७७.०० प्रति किलो | रू. १८५.७६ प्रति लिटर |
| ३ | टेमीफॉस ५० % इ.सी. | १५० लिटर | रु. ६७१.०० प्रति लिटर | रु. १३८६.०० प्रति लिटर | रू. ६३७.०० प्रति लिटर | रु. १४३१.०० प्रति लिटर |
| ४ | डेल्टामेथ्रीन २.५ % फ्लो | ३०० लिटर | रु. ९१८.०० प्रति लिटर | रु. १५५०.०० प्रति लिटर | रु. ८७९.०० प्रति लिटर | रु. १६३९.०० प्रति लिटर |
| ५ | डेल्टामेथ्रीन १.२५ % यु.एल.व्ही. | ५०० लिटर | रु. ९९८.०० प्रति लटर | रु. १४८०.०० प्रति लिटर | रु. ९६९.०० प्रति लिटर | रु. १५६६.०० प्रति लिटर |
| ६ | सायफ्लोथ्रीन १.२५ % डब्ल्यु.डब्ल्यु | ५०० लिटर | निरंक | रु. १९००.०० प्रति लिटर | रु. १९५७.०० प्रति लिटर | रु. २०१४.०० प्रति लिटर |
| ७ | बेसीलस थुरूनजेन्सीस इस्त्रायलनेसीस (बीटीआय) -एच - १४, १२०० आय टी यु पोटन्सी ॲक्वायस ससपेन्शन | ५०० लिटर | निरंक | रु. १४६६.५० प्रति लिटर | रु. १५०९.०० प्रति लिटर | रु. १५५३.९० प्रति लिटर |
| ८ | अल्फा सायपरमेथ्रीन ५ % डब्ल्यु पी | १०० किलो | रू. १२३७.०० प्रति किलो | रु. १९१७.०० प्रति किलो | रु. ११९७.०० प्रति किलो | रु. २०३२.०० प्रति किलो |

| अ.क्र. | किटक नाशके अळी नाशके उंदीर नाशके | आवश्यक अंदाजीत परिमाण | घरडा केमिकल्स | रमेश ॲग्रोकेम कॉर्पोरेशन | डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | श्रीराम ॲग्रो एजन्सी |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | मॅलेथिओन ५ % डी.पी | ६००० किलो | निरंक | रु.१८.८० प्रति किलो | रु.२१.०० प्रति किलो | रु.१७.९० प्रति किलो |
| १० | अझादिरॅक्टीन ३०० पी.पी.एम (०.००३ %) | ६०० लिटर | निरंक | रु.२९१.५६ प्रति लिटर | रु.२७०.०० प्रति लिटर | रु.४५३.०० प्रति लिटर |
| ११ | झींक फॉस्फॉईड टेक्नीकल अक्टीव्ह इनग्रेडीयंट ८० % | ३०० किलो | निरंक | रु. ४३०.०० प्रति किलो | रु. ३९०.०० प्रति किलो | रु. ४३०.०० प्रति लिटर |
| १२ | कॉमॅटेट्रालील ०.०३७५ % डब्ल्यु / डब्ल्यु (बॅट) | २०० किलो | निरंक | रु.३००.०० प्रति किलो | रु.३१०.०० प्रति किलो | रु.३६०.०० प्रति किलो |

प्राप्त निविदाकारांपैकी :-

**१. मे. घरडा केमिकल्स :-** ही मुळ उत्पादक कंपनी आहे.

**२. मे. रमेश ॲग्रोकेम कॉर्पोशन :-** १) बायर क्रॉप सायन्स २) बी.ए.एस.एफ ३) इंडिक्ले ४) युनायटेड फॉस्फरस ५) सन ॲन्ड ओशन ॲग्रो या मुळ उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत.

**३. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन** :- १) इंडीक्ले २) युनायटेड फॉस्फरस ३) फिकॉम ऑरगॅनिक्स ४) सन ॲन्ड ओशन ॲग्रो इंडिया लिमिटेड ६) गोदरेज साराली ली. ६) बायर क्रॉप सायन्स ७) बी.ए.एस.एफ या नामांकित मुळ उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रते आहेत.

**४. श्रीराम ॲग्रो एजन्सी :-** १) बायर क्रॉप सायन्स २) नॅशनल पेस्टीसाईड ३) इंडीक्ले ४) बी.ए.एस.एफ या मुळ उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रते आहेत.

वरील तुलानात्क तक्त्यात नमुद केलेल्यानिविदापैकी :-

**१) रमेश ॲग्रोकेम कॉर्पोरेशन :-** यांचे दर बाब क्र. १, २, ६, ७ व १२ साठी सर्वात कमी आहेत.

**२) डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन :-** यांचे दर बाब क्र. ३, ४, ५, ८, १० व ११ साठी सर्वात कमी आहेत.

**३) श्रीराम ॲग्रो एजन्सी** :- यांचे दर बाब क्र. ९ साठी सर्वात कमी आहेत.

सन २००३-२००४ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात रू. ७०,००,००० /- तरतुद किटक नाशके खरेदी कामी करण्यात आली आहे. पैकी रू. ४०,००,००० /- तरतुद शिल्लक आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता सन. २००३-२००४ साठी डास नाशके, अळी नाशके, किटक नाशके इत्यादी वरील अंदाजित परिमाणानुसार प्रत्येक बाबीसाठी सर्वात कमी दराचे निविदाकाराकडून खरेदी करणेस व त्याच्यासाठी येणाऱ्या रू. ३७,३९,४०० /- (सदतीस लाख एकोनचाळीस हजार चारशे मात्र) खर्चास ही समिती मंजुरी देत आहे.

अंदाजित परिमाणात आवश्यकतेनुसार बदल करण्याची आवश्यकता भासल्यास त्याप्रमाणे प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात यावी परंतु असे करतांना मा. स्थायी समितीने दिलेल्या एकुण आर्थिक मंजूरीचे अधिन राहूनच कार्यवाही करावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. दिनेश द. नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ दुपारी ०१.०५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**